बुधवार, २ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक -८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESAY 02 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-8 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# पुणे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती, तरुणांचे स्वप्न पूर्ण करणारे शहर

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते १५ हजार कोटींच्या कामांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी पुण्यात १५ हजार कोटी रुपयांच्या कामांचे लोकार्पण केले आहे. पुणे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती आणि तरुणांचं स्वप्न पूर्ण करणारे शहर आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले. यावेळी पंतप्रधान मोदींनी कर्नाटक आणि राजस्थानमधील काँग्रेस सरकारवर हल्लाबोल केला आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या मुख्य उपस्थितीत आणि टिळक स्मारक समितीच्या डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते नरेंद्र मोदींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला शरद पवार उपस्थित राहिल्यामुळे त्यांच्या राजकीय भूमिकांविषयी शंका उपस्थित केली जात आहे. काँग्रेस आणि शिवसेनेच्या ठाकरे गटातील नेत्यांसह अनेक राजकीय विश्लेषकांनी शरद पवारांमुळे लोकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होत असल्याची वक्तव्ये केली आहेत. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचित केली. यावेळी त्यांना शरद पवारांच्या भूमिकेविषयी विचारण्यात आलं. त्यावर अजित पवार म्हणाले, हा कार्यक्रम फार पूर्वीच ठरला होता. टिळक परिवाराची ही संस्था आहे. या संस्थेद्वारे अनेक दिग्गजांना हा पुरस्कार दिला आहे. संस्थेने ठरवले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यंदाचा पुरस्कार दिला जावा. परंतु, पंतप्रधानांशी संपर्क कसा करायचा हा प्रश्न त्यांच्यासमोर होता. त्यामुळे त्यांनी शरद पवारांशी संपर्क केला.

पंतप्रधान म्हणाले, बंगळुरू आयटी हब असून जागतिक गुंतवणूकीचे केंद्र आहे. अशावेळी कर्नाटक आणि बंगळुरूचा विकास होण्याची गरज होती. पण, ज्या प्रकारच्या घोषणा करू कर्नाटकात सरकार बनवण्यात आले. त्याचे दुष्परिणाम सगळा देश पाहतोय. एखादा पक्ष आपल्या स्वार्थासाठी सरकारची तिजोरी रिकामी करतो. याचे नुकसान राज्यातील जनतेला भोगावे लागतात.

पक्षांचे सरकार बनत असते, पण लोकांचे भविष्य धोक्यात घातले जाते. बंगळुरू आणि राज्याच्या विकासासाठी पैसे नाहीत, असं कर्नाटक सरकार स्वतःहा सांगत आहेत. ही देशासाठी चिंताजनक बातमी आहे, असे पंतप्रधान म्हणाले. राजस्थान राज्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे. राज्यात विकासकामे ठप्प पडली आहेत, अशी टीकाही पंतप्रधानांनी राजस्थानमधील काँग्रेस सरकावर केली आहे.

२०१४ च्या पूर्वीच्या सरकारने शहरांत गरीबांना घरे देण्यासाठी दोन योजना तयार केल्या. त्याअंतर्गत देशात ८ लाख घरे बनवली गेली. या घरांची स्थिती एवढी वाईट होती की लोकांनी ते घेण्यास नकार दिला. झोपडीत राहणारा व्यक्ती घर नाकारत असेल, तर त्याची स्थिती किती वाईट असेल? महाराष्ट्रातही ५० हजारांहून अधिक घरे पडून राहिली, असे पंतप्रधानांनी सांगितले.

# दोन हजारांच्या नोटा बँकांकडे जमा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** चलनातून दोन हजार रुपयांच्या नोटा परत घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर ३१ जुलै २०२३ अखेर बँकांकडे ८८ टक्के नोटा जमा केल्या गेल्या असून, चलनात असलेल्या ३.६२ लाख कोटी रुपये मूल्याच्या दोन हजार रुपयांच्या नोटांपैकी बँकिंग प्रणालीमध्ये ३.१४ लाख कोटी रुपये मूल्याच्या नोटा जमा झाल्या आहेत, अशी माहिती बँकेने मंगळवारी दिली.

रिझर्व्ह बँकेने १९ मे रोजी अचानक दोन हजार रुपयांच्या नोटा चलनातून परत घेण्याचा निर्णय घेतला आणि ३० सप्टेंबपर्यंत बँकांमध्ये या नोटा जमा करण्याच्या किंवा त्याच मूल्याच्या दुसऱ्या नोटा बदलून घेण्याचे आवाहन लोकांना करण्यात आले. त्यानंतर, दोन तृतीयांशपेक्षा अधिक म्हणजे जवळपास ८८ टक्के नोटा बँकांमध्ये जमा झाल्या असून अजूनही सुमारे ४२ हजार कोटी रुपये मूल्याच्या नोटा बँकिंग प्रणालीत परत आलेल्या नाहीत. परत आलेल्या दोन हजार रुपयांच्या नोटांपैकी ८७ टक्के ठेवी स्वरूपात आल्या आणि उर्वरित सुमारे १३ टक्के नोटा अन्य मूल्याच्या नोटांमध्ये बदलण्यात आल्या आहेत. दोन हजार रुपयांच्या नोटा जमा करण्यासाठी ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत आणखी दोन महिन्यांचा उपयोग करून घेण्याचे आवाहन केले आहे.

# मणिपूर पोलीस महासंचालकांना कोर्टात हजर राहण्याचे निर्देश

## सर्वोच्च न्यायालयाची कडक टिप्पणी


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मणिपूरमध्ये हिंसाचार काही थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही. मणिपूर प्रकरणावर नुकतीच सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली असून या प्रकरणी न्यायालयाने पोलीस प्रशासनावर कडक शब्दात टीप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने मणिपूरच्या पोलिस महासंचालकांना न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले आहे. मणिपूरमधील परिस्थिती राज्यातील पोलीस प्रशासनाच्या नियंत्रणाबाहेर असल्याची टीप्पणीही सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी केली आहे. मणिपूरमध्ये 3 मे रोजी आरक्षणाच्या मुद्द्यावरून हिंसाचार उसळला होता. या हिंसाचारामध्ये आतापर्यंत 160 हून अधिक लोकांना आपले प्राण गमवले आहेत. मात्र, अद्यापही येथील हिंसाचार सुरुच आहे. आतापर्यंत शेकडो लोक बेघर झाले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने मणिपूर हिंसाचार प्रकरणावर 1 ऑगस्ट रोजी सुनावणीमध्य पोलीस आणि प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी म्हटले आहे की, राज्यातील परिस्थिती पोलिसांच्या नियंत्रणाबाहेर गेल्याचे स्पष्ट दिसत आहे. मे महिन्यापासून राज्यातील कायदा व्यवस्था ठप्प झाली आहे. पोलीस महासंचालकांना कोर्टात हजर राहण्याचे निर्देश

सर्वोच्च न्यायालयाने आता मणिपूरच्या पोलीस महासंचालकांना न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने 6500 एफआयआरचे वर्गीकरण देण्यास सांगितले आहे. सोमवार, 7 ऑगस्ट रोजी दुपारी 2 वाजता या प्रकरणाती पुढील सुनावणी पार पडणार असून यावेळी मणिपूरच्या पोलीस महासंचालकांना प्रत्यक्ष हजर राहून प्रश्नांची उत्तरे देण्यास सांगण्यात आले आहे.

तपास सीबीआयकडे सोपवण्याची मागणी



**महिला व्हायरल व्हिडीओ प्रकरण**

सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलेल्या निरीक्षणात म्हटलं आहे की, एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे की, महिलांच्या व्हायरल व्हिडीओ प्रकरणात एफआयआर नोंदवण्यास बराच विलंब झाला आहे. महिलांची निर्वस्त्र धिंड प्रकरणात व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी पीडित महिलांचा जबाब नोंदवला.

सीजेआय चंद्रचूड यांनी निरीक्षण नोंदवले की, एक किंवा दोन एफआयआर वगळता इतर आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. पोलीस तपास खूपच सुस्त आणि संथगतीने सुरु आहे. दोन महिन्यांनंतर एफआयआर नोंदवले गेले, मात्र, जबाब नोंदवले गेले नाही.

मणिपूर हिंसाचार प्रकरणाची सुनावणी सीबीआयकडे सोपवण्याची मागणी करण्यात येत आहे. यावर न्यायालयाने निरीक्षण नोंदवत म्हटले की, एफआयआरही नोंदवला जात नव्हता. 6000 पैकी 50 एफआयआर जरी सीबीआय कडे सोपवल्या तरी उरलेल्या 5950 चे काय होणार, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. सुप्रीम कोर्टाने पुढे म्हटले की, हे स्पष्ट आहे की महिलांच्या व्हायरल व्हिडीओ प्रकरणात एफआयआर नोंदवण्यास खूप उशीर झाला होता.

# संभाजी भिडेंना तत्काळ अटक करा

## अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद धुळे जिल्हा तर्फे जुनी महानगरपालिका जवळ वादग्रस्त वक्तव्य प्रकरणी मनोहर भिडे यांच्यावर कारवाई करत देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी अशी मागणी घेऊन आंदोलन करण्यात आले.

मनोहर भिडे यांच्याकडून वारंवार महापुरुषांच्या बाबत वादग्रस्त वक्तव्य करण्यात येत आहे काही दिवसापूर्वी त्यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विषयी वादग्रस्त वक्तव्य केले व आता थेट देशाला स्वातंत्र्य मिळून देणारा राष्ट्रपती महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विषयी बेताल वक्तव्य केले म्हणून भिडे यांच्यावर महापुरुषांचा अपमान करीत असून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे त्यामुळे समाजात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे तरी मनोहर भिडे यांच्यावर गुन्हा दाखल करत अटक करावी तसेच कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी धुळे जिल्हा समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,



खान्देश माळी महासंघ तर्फे पुतळा दहन करून निषेध करण्यात आला यावेळी समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेश बागुल, जिल्हा सचिव बापू महाजन,दिलीप आप्पा देवरे, आण्णा माळी सर, अनिलकुमार बोरसे, ईश्वर माळी, प्रकाश शिरसाट, राजकिशोर तायडे, धीरज माळी,शिरपूर तालुका अध्यक्ष-पिंटु माळी, साक्री तालुका अध्यक्ष-रविंद्र खैरनार, चैत्राम भदाणे, चेतन खैरनार, बिपीन रोकडे,बी.एच जाधव, एस.टी. चौधरी, भुषण माळी, विठोबा माळी, गुलाब माळी, डॉ.सुनिल वाघ, सुमित चौधरी,मनिष पाटकरी, राजेश महाजन, कांतीलाल माळी, अमोल अहिरे, रविंद्र माळी,नवल माळी आदी समता सैनिक उपस्थित होते.

# चंद्रपूर जिल्ह्यात बालतस्करीविरुद्ध जनजागृती मोहीम

आधुनिक केसरी न्यूज


चंद्रपूर : जागतिक मानवी तस्करी विरोधी दिनानिमित्त, रुरल अँड अर्बन डेव्हलपमेंट युथ असोसिएशन, गडचिरोली अंतर्गत चंद्रपूर येथील असेस टू जस्टिस प्रकल्पान्वये, जिल्ह्यातील हॉटस्पॉट असलेले ठिकाण जसे, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड, बाजारपेठ, चंद्रपूर व बल्लारपुर ही शहरे आदी तालुक्यातील ठिकाणी बालतस्करी विरुद्ध जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यावेळी माहिती फलके, पत्रके वितरीत करुन तसेच घोषवाक्य देत प्रभात फेरी काढण्यात आली.

बालतस्करी विरुद्ध जनजागृती मोहिमेला बल्लारपूर स्टेशन प्रबंधक नंदनवार, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा क्षमा बासरकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर, रेल्वे पोलिस कर्मचारी प्रवीण गावडे यांच्यासह असेस टु जस्टीस प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक नरेश मॅकलवार, समुपदेशिका राणी मेश्राम, कम्युनिटी सोशल वर्कर पुनम साळवे, सोनल रामटेके, बालाजी जाधव, शशिकांत मोकाशे, समन्वयक अभिषेक मोहरले, समुपदेशिका दिपाली मसराम, किरण बोरा आदींची उपस्थिती होती.

रुरल अँड अर्बन डेव्हलपमेंट युथ असोसिएशन गडचिरोली अंतर्गत जिल्ह्यात असेस टू जस्टिस प्रकल्प अनेक दिवसांपासून शाळा, अंगणवाडी, पंचायत समिती क्षेत्रात तसेच घरोघरी जाऊन बालतस्करी व बालमजुरी विरुद्ध जनजागृती मोहीम राबवित आहे. विशेष म्हणजे, नागरीकांना बालतस्करी थांबवण्यासाठी शपथ देखील देण्यात येत आहे. बाल तस्करी आणि बालमजुरी विरुद्ध



लोकांमध्ये जागरूकता वाढवणे हे या मागचे उद्दिष्ट आहे. बालतस्करीच्या बाबतीत सामान्य नागरीकांमध्ये जागरूकतेच्या अभाव असल्यामुळे बालतस्करी थांबवण्याचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाही. देशात बालशोषण किंवा मुलांची तस्करी रोखणे हे एक मोठे आव्हान आहे. असेस टू जस्टिस प्रकल्पाचे संस्थापक देवगडे म्हणाले आज अधिकाधिक नागरीक हरवलेल्या मुलांची तक्रार करण्यासाठी पुढे येत आहेत, हा एक मोठा बदल आहे. आम्ही तळागाळात सुरू केलेल्या जनजागृती मोहिमेमुळे लोकांची मानसिकता बदलली आहे आणि त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत, एक हा मोठा बदल आहे. शासन आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून मुलांची तस्करी रोखण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

ते सगळे पाहून पिंकी आणि राजेशला खूपच गंमत वाटली. त्यांनी आपल्याजवळील बिस्किटे, घरून आणलेल्या नारळाच्या वड्या त्यांना खाण्यासाठी दिल्या. मोकळी हवा, गर्द झाडी, प्रदूषणरहित आणि शांत वातावरण मन प्रसन्न करीत होते. श्यामरावांनी आपल्याजवळील कॅमेऱ्याने भोवतालच्या निसर्गाचे सुरेख चित्रीकरण केले. आता सगळ्यांनी झाडांच्या सावलीत असलेल्या मोकळ्या जागी सतरंजी टाकून जेवणाचा आस्वाद घ्यायचे ठरवले. सगळ्यांनाच भूक लागली होती. श्यामलाताईंनी घरून निघताना जेवणाची सगळीच तयारी करून घेतली होती. तांबड्या भोपळ्याच्या दशम्या, पोळ्या, वांग्याचं भरीत, शेंगदाण्याची चटणी, घरीच लावलेले मस्तपैकी दही, जोडीला नारळाच्या वड्या असा फर्मास बेत होता. रोज डायनिंग टेबलवर जेवण घेऊन कंटाळलेल्या मुलांना हे वनभोजन फारच आवडले. श्यामराव म्हणाले, 'पिंकी आणि राजेश, जरा नीट ऐका मी काय म्हणतो ते ! आपण परत जाताना आलो त्याच रस्त्याने जायचं की जवळच एक छानसं खेडं आहे, त्या बाजूने जायचं ? तिथे माझा सोपान म्हणून एक मित्र राहतो. त्यालाही भेटता येईल. जाताना तुम्हाला रस्त्याने शेतं पण बघायला मिळतील.' अहो बाबा, विचारताय काय ? आम्हाला तर ते खेडेगाव, शेती बघायला आवडेलच. आपण तिकडूनच जाऊ. ' पिंकी म्हणाली. राजेशने तर आज मज्जाच मज्जा म्हणून टाळ्या वाजवल्या. सगळे गाडीत जाऊन बसले. श्यामलाताईंनी आपल्या मोबाईलमध्ये जुनी गाणी लावली होती. त्यांना जुनी मराठी गाणी खूप आवडायची. 'ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी व्हाऊ दे...' या गाण्याचा व्हिडीओ त्या पाहत होत्या. पिंकी आणि राजेश कुतूहलानं आई काय पाहतेय हे बघत होते. त्या गाण्यातील लोहाराचा भाता, ऐरण मुलं कौतुकानं बघत होती. गाणं संपलं. पिंकी म्हणाली, ' आई, हे गाणं किती छान आहे नाही. आणि गाण्यातली माणसं किती साधी आहेत ! ' आई म्हणाली , ' पिंकी, अग हे गाणं ज्या चित्रपटात आहे, त्या चित्रपटाचं नावसुद्धा ' साधी माणसं असंच आहे. '' अरे वा, किती छान ! ' पिंकी म्हणाली.

' आई, हे गाणं लता मंगेशकर यांनी गायलं आहे ना ? ' राजेश म्हणाला.


' हो, बरोबर आहे राजेश. पण आणखी एक गंमत आहे बरं का ! '

' कोणती गंमत, आई ? सांग ना . ' राजेश म्हणाला. ' अरे या गाण्याचं संगीत ऐकलंस ना ! किती छान आहे. हे संगीत कोणी दिलं माहिती आहे का ?

' कोणी तरी प्रसिद्ध संगीतकार असतील त्या काळातले, ' पिंकी मध्येच म्हणाली.



## समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

## अंतर्मनाला सक्षम व कार्यक्षम करत राहावे

आधुनिक केसरी

आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. आध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतःप्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व-मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो. आपण आपल्या अंतर्मनाला सक्षम करण्याची, त्याची कार्यक्षमता वाढवण्याची जरुरी असते. आपले अंतर्मनच आपला गुरु आणि मार्गदर्शक म्हणून कार्यरत होत राहते. गुरु आणि गुरुतत्व ह्याबद्दलची ओळख मूळ तत्वापासून केली जाते. त्यात गुरु आणि गुरुतत्व यातील फरक तसेच तत्व म्हणजे काय ह्याचे महत्वही समजून घेतले पाहिजे. सध्याचे मानवी जीवन असे विस्कळीत झाले आहे, हे शास्त्रीय मीमांसेतून स्पष्ट होत असतेच, परंतू त्याच्याकडे अनकेदा दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. सध्याची परिस्थिती, त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## लाभो ऐसे मौन | माझ्या जीवा ||

कृपेचा तू सिंधू | मायेचे आगर ||
करूणा सागर | विटेवरी ||१||
भक्तीचा उमाळा | प्रेमाचा जीव्हाळा ||
लावी जीवा लळा | आळंदीत ||२||
ज्ञानाचे भांडार | भंडारी उधळी ||
भक्तीची लव्हाळी | देहु गावी ||३||
नामदेव झाला | ब्रह्माची पायरी ||
मोक्षाची पायरी | जना मुक्ता ||४||
शांतीरूप ब्रह्म | नाथा व्हावे मन ||
लाभो ऐसे मौन | माझ्या जीवा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

अज्ञेयाऽसि यथा लीला भवानि तव वर्तते | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ५५ || ज्याप्रमाणे तुझी लीला, त्याप्रमाणे तू देखील अज्ञेय आहेस. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सद्गुरु ज्ञान स्वरुप है, सोत महानद आय ।
देव सदाफल गुरु बिना, तत्त्व ज्ञान नहिं पाय
।।२९।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल चतुर्थ अध्याय)
०४/०४/२९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्गुरू ज्ञानस्वरूप आहेत, ज्यांच्यामधे ईश्वरीय ज्ञानधारा प्रगट होते; त्यांच्यामुळेच शुद्ध, पवित्र आणि निर्भ्रांत ज्ञान प्राप्त होते. सद्गुरूं शिवाय ज्ञानप्राप्ती होऊ शकत नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## "पिंडी ते ब्रम्हांडी"

आधुनिक केसरी



आपण ज्यांना निसर्ग नियम म्हणतो ते जीवन जगण्याचे नियम असतात. म्हणून जगात स्थिर व्यवस्था आढळते नाही तर काय झाले असते.एक गोष्ट लक्षात येते की कार्यकारणभाव सत्ता गाजवतो. चार तत्त्वावर असलेली पिंडब्रम्हांडाची रचना 1 )चार देह-स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण 2 )चार अवस्था-जागृत, स्वप्न, सुषुप्ति तुर्या 3 )चार अभिमान-विश्व, तेजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा 4 )चार स्थाने--नेत्र कंठ, ह्ददय, मूर्धा 5 )चार भोग--स्थूल, प्रविविक्त, आनंद, आनंदावभास 6 )चार गुण--सत्व,रज,तम, शुध्दसत्व चार मात्रा--अ,उ, म,व अर्धा मात्रा किंवा ईश्वर चार शक्ति--इच्छा, क्रिया, द्रव्य, ज्ञान. अशी एकुण बत्तीस तत्वे मिळून पिंडब्रम्हांडाची रचना झाली. आता मित्रांनो एक सांगते अनेकांनी अनेकवेळा अभ्यास पूर्वक हे सर्व शोधून पिंडब्रम्हांडाची तत्वे सांगितली आहेत. पण यावर प्रत्येकाने मतमतांतर करत बसून विनाकारण वेळ वाया घालवू नये फक्त संतवचनावर विश्वास ठेवून परमात्म्याला शरण जावे त्याच्या वाणीवर विश्वास ठेवावा .




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नाम सद्गुरूकडून घेणे श्रेयस्कर.

आधुनिक केसरी

नाम सदगुरूकडूनच घेणे जरूर आहे की ते आपणच आपल्या आवडीप्रमाणे घेतले तरी चालेल ? वास्तविक भगवंताचे नाम स्वतःसिद्ध आहे आणि परिपूर्ण आहे; त्याला दुसऱ्या कुठून पूर्णता प्राप्त करून घ्यायची असते असे नाही. म्हणून सदगुरूकडून घेतलेले नाम आणि आपण स्वतःच्या पसंतीने घेतलेले नाम ह्यांत फरक करता येत नाही. तरीसुध्दा सदगुरूकडून घेतलेल्या नामाचे वैशिष्टय आहेच. ते असे की तो त्या नामाच्या पाठीशी सत्तारूपाने असतो आणि आपल्याकडून नामस्मरण होण्यात त्याची आपल्याला फार मदत होते. त्यामुळे आपल्या हातून होत असलेले नामस्मरण त्याच्या सत्तेनेच होत आहे ही जाणीव राहून मी नामस्मरण करतो अशा तऱ्हेचा अहंकार उत्पन्न व्हायला वावच राहात नाही. सदगुरूच्या आज्ञेचे पालन करता करता साधकाला नामाची गोडी लागते आणि नाम पोटभर घेतल्याने त्याचा आत्मा तृप्त होतो. म्हणून सदगुरूकडून नाम घेणे जरूर आहे. सदगुरूची भेट होईपर्यंत मात्र आपण आपल्याकडून नामस्मरण करीत राहणे आवश्यक आहे कारण ते नामस्मरणच आपल्याला सदगुरूची भेट करवून देईल. तसे पाहता आधी संताची भेट होणे कठीण; समजा भेट झाली तरी त्याच्यावर विश्वास बसणे त्याहून कठीण असते. म्हणून नामाचे साधन चालू ठेवावे. खडीसाखर ठेवली म्हणजे मुंगळयांना आमंत्रण करावे लागत नाही ते आपोआप तिचा शोध काढीत येतात. तसे तुम्ही खडीसाखर बना म्हणजे संत तुमच्याकडे धावतच येतील. खडीसाखर बना म्हणजे संतांना आवडेल असे वर्तन करा. संतांना काय आवडते ? भगवंताचे अनुसंधान आणि अखंड नामस्मरण याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट त्यांना प्रिय नाही. म्हणून आपल्या ह्दयामध्ये नामाची ज्योत अखंड तेवत ठेवा. सदगुरू तुमचा शोध घेत येतील आणि तुमच्यावर कृपेचा वर्षाव करतील.



आता अशा रीतीने सदगुरूने नाम दिल्यावर एखाद्याला असे वाटेल की मी 'राम राम' असे म्हणत होतोच आणि आता सदगुरूने तेच सांगितले तर मग यात काय मोठे झाले ? पण यातच विशेष आहे कारण यात मी कर्ता हा अभिमान टाकावा लागतो. सदगुरूकडून नाम घेतले म्हणजे आपल्या कर्तेपणाच्या अभिमानाला वाव रहात नाही. मिठाचा एकच खडा खीर नासवायला कारणीभूत होतो. म्हणून अभिमान टाकणे ही गोष्ट फार महत्वाची ठरते. भगवंताचे नाम हे औषध समजावे भगवंताची प्राप्ती हे त्याचे फळ जरूर तेवढेच करणे, म्हणजे सांगितलेले तेवढेच करणे, जास्त न करणे, हे त्याचे अनुपान समजावे. औषध मात्र थेंबथेंब आणि सतत पोटात गेले पाहिजे.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

"मला सगुणआपण आपल्या सद्गुरूचे आहोत असे छातीठोकपणे सांगत चला. काही नाही केलेत तरी चालेल, पण आपले सद्गुरू आपल्या मागेपुढे आहेत अशी दृढ भावना असावी. काही लोक सर्व पटून सुद्धा अनुग्रह घेण्यास धजावत नाहीत कारण त्यांच्या अज्ञाना मुळेच त्यांच्या कल्पनाच विचित्र असतात.विशेष म्हणजे अनुग्रह म्हणजे बंधन असे ते मानतात व मुक्त रहाण्यासाठी अनुग्रह नको असा त्यांचा विचार असतो.ह्या लोकांनी हे लक्षात घेतले पाहिजे कि अनुग्रह काही बाजारात विकत मिळणारी वस्तू नाही. ती मिळण्यास महान भाग्यच लागते. पूर्व सुकृत चांगले असेल तरच अनुग्रह होतो. इतिहासात असे अनेक उदाहरणे आहेत.कि महान सत्पुरुषांना देखील अनुग्रहासाठी अनेक खास्ता खाव्या लागलेल्या आहेत जिज्ञासूनी प.पु. ब्रम्हचैतन्य महाराज गोन्दावलेकर महाराजांचे चरित्र जरूर वाचावे थोडक्यात हे बंधन जरूर आहे पण प्रेमाचे बंधन आहे. क्रमशः



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

क्वचिदुष्टाः क्वचित्तुष्टास्तुष्टा रुष्टाः क्षणे क्षणे ।
अव्यवस्थितचित्तानां प्रसादोऽपि भयंकरः ॥

स्पष्टीकरण - चंचल व अस्थिर वृत्तीच्या लोकांचे उपकारसुद्धा स्वीकारू नयेत. ते भयंकर असतात. त्या उपकारांनीही आपल्या पदरात वास आणि वैताग हेच पडत असतात. असे लोक विश्वासपात्र नसतातच मुळी. आताच्या क्षणाला कृपा केली, तर पुढच्याच क्षणाला ते शाप द्यायलाही कमी करणार नाहीत.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २ ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



# समृद्धी महामार्गावर गर्डर कोसळले

## अपघातात पाच इंजिनियरसह २० जणांचा दुर्दैवी मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** समृद्धी महामार्गावरील अपघाताचे सत्र सुरुच आहे. समृद्धी महामार्गावर गर्डर कोसळून मोठी दुर्घटना घडली. शहापूरमध्ये घडलेल्या या दुर्घटनेत २० जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे समृद्धी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचे काम सुरु असताना गर्डर कोसळून मोठा अपघात झाला आहे. या अपघातात पाच इंजिनियरसह एकूण 20 जणांचा मृत्यू झाला आहे. तर काही जण जखमी झाल्याचीही माहिती समोर येत आहे.

पहाटेपर्यंत 17 जणांचे मृतदेह सापडले होते. त्यानंतर गर्डरखाली काही जण अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत होती. तर काही गंभीर जखमींना शहापूर उप जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गर्डरखाली दोन मृतदेह सापडल्याने आता मृतांचा आकडा २० वर पोहोचला आहे. एनडीआरएफचे अधिकारी सारंग कुर्वे यांनी दिलेल्या माहितीनुसार,

> पालकमंत्री शंभुराजे देसाई यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. शंभुराजे देसाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातात 20 लोकांचा मृत्यू झाला आहे. तीन जण जखमी असून त्यांची तब्येत स्थिर आहे, त्यांना ज्युपिटर रुग्णालयात उपचारासाठी शासनाकडून हलवले जाईल. अपघाताचे कारण नेमके काय हे चौकशीनंतर कळेल. 20 मृतदेहांच्या कागदपत्रांची पुर्तता करत आम्ही पाठवण्याचे बंदोबस्त करत आहोत. चौकशीत प्राथमिक गोष्टी समोर येत नाही तोपर्यंत हे का घडले हे सांगणे कठीण आहे.

प्रशासनाकडून सांगितल्याप्रमाणे 28 जणे इथे उपस्थित होते. त्यापैकी २०जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. तीन जण जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तर पाच जणांना वाचवण्यात यश आलं आहे. आता रेस्क्यू ऑपरेशन थांबवण्यात आलं आहे. शाहपूर सरलांबे येथे गर्डर मशीनला जोडणारी क्रेन आणि स्लॅब तब्बल शंभर फूट उंचावरुन मजूरांच्या अंगावर कोसळून हा भीषण अपघात घडला. या अपघातात इंजिनिअर आणि मजूरांना जीव गमवावा लागला आहे. समृद्धी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचे काम सरु असताना सोमवारी रात्रीच्या वेळी ही दुर्दैवी घटना घडल्याची माहिती आहे.

नवयुगा इंजीनियरिंग कंपनीचे स्थानिक कॉन्ट्रॅक्टर आणि गर्डर लॉंच करणाऱ्या व्ही एस एल कंपनीच्या स्थानिक कॉन्ट्रॅक्टर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहापूर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम 304 अ, 337, 338 आणि 34 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कंपनीच्या कॉन्ट्रॅक्टरच्या निष्काळजी आणि हलगर्जीपणामुळे कामगारांचा मृत्यू झाला आहे. कामगारांच्या मृत्यूला कारणीभूत झाल्याने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी असलेल्या प्रेम प्रकाश साव यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मृतकाच्या कुटुंबीयांना आमदार धानोरकर यांचा मदतीचा हात

## चार लक्ष रुपयांचा निधी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अतिवृष्टीतील पुरामध्ये भद्रावती तालुक्यातील पिपरी येथील अंकुश शामराव खेडेकर यांचा नदीत बुडून मृत्यू झाला. आमदार प्रतिभाताई बाळुभाऊ धानोरकर यांच्या प्रयत्नाने त्यांच्या कुटुंबीयांना नैसर्गिक आपत्ती निधी अंतर्गत चार लक्ष रुपये मंजूर झाले. आज त्यांचे वडील शामराव खेडेकर यांना भद्रावती तहसील कार्यलयात आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या हस्ते धनादेश देण्यात आला.

यावेळी तहसीलदार अनिकेत सोनवणे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत काळे, भद्रावती शहर काँग्रेस अध्यक्ष सुरेश गावंडे, प्रमोद नागोसे, प्रशांत झाडे, किशोर हेमके उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार प्रतिभाताई धानोरकर म्हणाल्या की, समाजाच्या शेवटच्या घटकाला न्याय देण्याचा नेहमी धानोरकर कुटुंबीयांनी प्रयत्न केला आहे. पुढे देखील हा प्रयत्न सुरूच राहील. त्यासोबत पावसाळ्यात विशेषतः युवकांनी नदी व इतर धोकादायक ठिकाणी आपला जीव धोक्यात टाकू नये असे आवाहन देखील यावेळी त्यांनी केले.




# गणेशमंडळांना मिळणार पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर:** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णय क्र.पुलदे-2023/ प्र.क्र.1/ सां.का.2, दि. 4 जुलै 2023 अन्वये, दि. 19 सप्टेंबर 2023 पासून सुरू होणाऱ्या सन 2023 च्या गणेशोत्सवात उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्याकरीता स्पर्धा आयोजित करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार, सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या 10 निकषांची पूर्तता करणाऱ्या व करू शकणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या ई-मेलवर दि. 5 सप्टेंबर 2023 पूर्वी ऑनलाईन अर्ज सादर करावेत. अर्जाचा नमुना 4 जुलै, 2023 च्या शासन निर्णयात उपलब्ध असून सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे नायब तहसिलदार (सामान्य) गिता उत्तरवार यांनी कळविले आहे.

# गावातील पाणंद रस्त्याची वाळूचोरट्यांनी केली दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** शेतातील उत्पादित माल व शेताकडे जाण्यासाठी शेतकऱ्यांना सोयीचे होईल याकरिता पांदण रस्त्यांचा उपयोग होतो. प्रत्येक गावात शेतशिवारात जाण्यासाठी पांदण रस्ते असून या रस्त्यांची महसूल दप्तरी नोंद आहे. मात्र देखभालीअभावी आणि विशेषतः याच मार्गाने रात्रंदिवस सुरू असलेल्या रेती तस्करीमुळे मोहाडी तालुक्यातील निलज बु. गावातील पांदण रस्त्याची दुरवस्था झाली असून या जीवघेण्या रस्त्यामुळे शेतकरी प्रचंड त्रस्त आहेत.

मोहाडी तालुक्यातील निलज बु. येथील मधुकर गाढवे यांच्या घरापासून ते रेती घाटपर्यंत हा पांदन रस्ता आहे. ग्रामस्थांना शेतशिवारात जाण्यासाठी याच मार्गाने जावे लागते. मात्र सद्यस्थितीत या रस्त्यावरून चालताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मोहाडी तालुक्यातील मोठा असा निलज बुज हा रेती घाट असून या घाटावर मोठ्या प्रमाणात रेतीचा उपसा केला जातो. रेती घाटाकडे जाण्यायेण्यासाठी रेती तस्कर याच मार्गाचा वापर करतात. दिवस रात्र या मार्गावरून रेती तस्करांचा धुमाकूळ असतो. त्यामुळे आधीच खराब झालेल्या या पांदन रस्त्याची पाऊस पडल्यानंतर आणखीनच दुरवस्था झाली आहे. त्यामुळे शेतीकडे जाताना विशेषतः रात्रीच्या वेळी शेतावर मोटार पंप सुरू करण्यासाठी जाताना शेतकऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. शिवाय याच रस्त्याच्या पलीकडे गावातील प्रसिद्ध हनुमान मंदिर, माता माय मंदिर, कबीर आश्रम तसेच स्मशानघाटसुद्धा आहे. काही महिन्यांआधी मातोश्री ग्राम समृद्धी पांदन रस्ता योजनेअंतर्गत हा रस्ता मंजूर झाला असून या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी गावकरी करीत आहेत. गुरुदेव भागवत बुधे यांच्यासह सर्व गावकऱ्यांनी तहसीलदार दीपक करंडे यांना याबाबत पत्राद्वारे मागणी करून लवकरात लवकर हा पांदन रस्ता दुरुस्त करून देण्याची आणि रेती तस्करांनी वाहतूक अन्य मार्गाने वळविण्याची मागणी केली आहे.





## मोदींचा कानमंत्र

आधुनिक केसरी

विरोधकांनी २६ पक्षांना एकत्र करून 'इंडिया' नावाची आघाडी स्थापन केली. त्यानंतर भाजपानेही एनडीएत प्राण फुंकण्याचा प्रयत्न केला. एनडीएमध्ये उत्साही वातावरण टिकून राहावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी एनडीए युतीमधील खासदारांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्याशी संवाद साधत आहेत. विरोधकांच्या आणि आपल्या आघाडीमध्ये फरक असल्याचे मोदींनी खासदारांना सांगितले. आपली युती होण्यास 'कारण' होते, तर विरोधक 'स्वार्थासाठी' एकत्र आले असल्याची टीका पंतप्रधान मोदींनी केली. सूत्रांनी माहिती दिली की, इंडिया आघाडीकडे पाहून खासदारांनी विचलित होऊ नये, अशी सूचना मोदी यांनी दिली आहे. लोक अजूनही या पक्षांनी (विरोधक) केलेल्या जुन्या भ्रष्टाचार प्रकरणांना विसरलेले नाहीत. त्यांच्या जुन्या पापांमुळे लोक अजूनही त्यांचा द्वेष करतात, असेही मोदी यांनी सांगितले. सोमवारी (दि. ३१ जुलै) पंतप्रधान मोदी यांनी महाराष्ट्र सदनमध्ये एनडीएच्या ४५ खासदारांची पहिली बैठक घेतली. या बैठकीला पश्चिम उत्तर प्रदेश आणि कानपूर-बुंदेलखंड क्षेत्रातील खासदार उपस्थित होते. मोदी यांनी यावेळी विविध विषयांवर मनोगत व्यक्त केले. बिहार विधानसभा निवडणुकीत २०२० साली जनता दल (यू) पेक्षा भाजपाच्या जास्त जागा येऊनही नितीश कुमार यांना मुख्यमंत्रीपद का दिले? तसेच पंजाबमध्ये अकाली दलाच्या सरकारला पाठिंबा दिला असताना भाजपाने उपमुख्यमंत्रीपद का घेतले नाही? यामागची कारणीमीमांसा सांगून मोदी यांनी युतीधर्माचे दाखले दिले. तसेच खासदारांनी इतरांना सोबत घेऊन काम करत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा एनडीएचेच सरकार येईल, असे प्रयत्न करण्याचे आवाहन मोदी यांनी केले. भाजपाने एनडीएच्या खासदारांना क्षेत्रानुसार विभागले असून ४० खासदारांचा एक गट तयार केला आहे. पावसाळी अधिवेशनाच्या दरम्यान प्रत्येक गटाशी पंतप्रधान नरेंद्र मोदी १० ऑगस्टपर्यंत रोज बोलणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खासदारांनी मतदारसंघात जाऊन काम करावे, स्थानिक मुद्द्यांवर काम करावे आणि लोकांमध्ये जाऊन सरकारच्या योजनांची माहिती द्यावी आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय विषयांवर भाष्य करणे टाळावे, असे मार्गदर्शन देत मोदींनी खासदारांना प्रोत्साहन दिले.पंतप्रधान मोदी म्हणाले की, छोट्यातला छोटा विषयदेखील निवडणुकीचा नूर पालटू शकतो. अशा विषयांना सोशल मीडियाच्या आधारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करा. यावेळी मोदी यांनी उत्तराखंड विधानसभा निवडणुकीत व्हायरल झालेल्या एका व्हिडीओ क्लिपचे उदाहरण दिले. या व्हिडीओमध्ये एक महिला म्हणते, मला किती मुले आहेत याची चिंता नाही. कारण माझा एक मुलगा (पंतप्रधान मोदी) दिल्लीत बसला असून तो आमच्या सर्वांची काळजी घेत आहे. पंतप्रधान मोदी यांच्या मते, सदर व्हिडीओ उत्तराखंडच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालात महत्त्वपूर्ण ठरला. या व्हिडीओमुळे भाजपाची पुन्हा एकदा उत्तराखंडमध्ये सत्ता आली. खासदारांनी लोकांमध्ये एक सकारात्मक संदेश घेऊन जावे आणि जास्तीत जास्त वेळ लोकांमध्ये घालवावा, असेही मोदी यांनी सांगितले.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

## भारतीय राष्ट्रध्वजाचे जनक: पिंगली वेंकय्या

आधुनिक केसरी

**भारतीय राष्ट्रध्वज तिरंगाचे रचनाकार पिंगली वेंकैया यांच्याबद्दलच्या १० खास गोष्टी. वयाच्या १९व्या वर्षीच ते ब्रिटीश लष्करात भरती झाले. ते दक्षिण आफ्रिकेमधील अँग्लो बोअर युद्धामध्ये सैनिक म्हणून ब्रिटिशांच्या बाजूने लढले. याच काळात त्यांची आणि महात्मा गांधींची दक्षिण आफ्रिके मध्ये भेट झाली. त्यानंतर पुढील पन्नास वर्षाहून अधिक काळ हे दोन्ही नेते एकमेकांच्या संपर्कात होते. पिंगली हे जियोलॉजीमध्ये डॉक्टरेट होते. ते हिरे खाण उत्खन्नातील तज्ञ होते. त्यामुळेच त्यांना डायमंड वेंकैया हे टोपणनाव देण्यात आले होते. कापसावरील संशोधनामध्ये त्यांना विशेष स्वारस्य असल्याने त्यांना कॉटन वेंकैया नावानेही ओळखले जायचे.**

त्यांना उर्दू तसेच जपानी भाषेबरोबरच इतरही अनेक भाषा अवगत होत्या. ३१ मार्च १९२१ मध्ये पिंगली यांनी विजयवाडा येथे झालेल्या काँग्रेस कार्यकारणीच्या बैठकीमध्ये भगव्या आणि हिरव्या रंगाचा झेंडा भारतीय राष्ट्रध्वज म्हणून सादर केला. मूळचे जालंधरच्या असणाऱ्या लाला हंसराज यांनी या झेंड्यावर चरखा असावा असे सांगत चरख्यासहीत हा झेंडा सादर केला तर गांधीजींनी भगव्या आणि हिरव्या रंगाच्यामध्ये पांढऱ्या रंगाच्या पट्टीचा सल्ला दिला. आणि अशाप्रकारे तिरंग्याचा जन्म झाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पिंगली यांच्या कल्पनेतून साकारलेल्या तिरंगी झेंड्याला भारताचा राष्ट्रध्वज म्हणून मान्यता मिळाली. भारतीय संविधान समितीने २२ जुलै १९४७ रोजी तिरंगा ध्वज भारताचा राष्ट्रध्वज म्हणून मान्य केला. भारतीय तिरंगा दिल्लीतील लाल किल्ल्यावर फडकताना पाहण्याची त्यांची इच्छा होती. मात्र त्यांच्या कुटुंबाकडे त्यांना दिल्लीला पाठवण्याइतके पैसे नसल्याने त्यांची ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. सन १९६३ साली पिंगली यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर काही दशकांनी सन २००९ साली भारतीय पोस्ट खात्याने त्यांच्या सन्मानार्थ पोस्टाचे तिकीट जारी केले. स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्यासाठी हे तिकीट जारी करण्यात आले होते. सन २०११ साली भारतरत्न पुरस्कारासाठी- मरणोत्तर पिंगली यांच्या नावाची शिफारस करण्यात आली होती. मागील काही वर्षांपासून त्यांच्या मुलीला सरकारकडून पेन्शन देण्यात येत आहे, हे विशेष उल्लेखनीय!

भारताचा ध्वज कोणत्या रंगाचा असावा ? त्यात किती आणि कोणते रंग असावेत ? त्याचा आकार कसा असावा ? आदी गोष्टींचा सखोल अभ्यास करून ज्यांनी तिरंगा साकारला. ते केवळ तिरंग्याचे निर्माते नव्हते तर जपानी भाषेचे शिक्षक, सिद्धहस्त लेखक आणि जिओफिजिसिस्टही होते.

ब्रिटीश भारत- सध्याचे आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील दिवी तालुक्यातील भटलापेन्नुमारू येथील हनुमंतरायुडू आणि वेंकटरत्नम्मा या दांपत्याच्या पोटी दि.२ ऑगस्ट १८७६ रोजी पिंगाली यांचा जन्म झाला. देशभक्तीने भारावलेल्या पिंगाली यांनी वयाच्या १९व्या वर्षी बोअर युद्धासाठी आपले नाव नोंदवले आणि ते सैन्यात भरती झाले. त्यानंतर आफ्रिकेत असताना त्यांची महात्मा गांधीजींशी भेट झाली आणि त्यांचे ऋणानुबंध जुळले. ते पुढे ५० वर्षे टिकून होते. भारतात परतल्यावर बंगलोर आणि मद्रास येथे त्यांनी रेल्वे गार्ड म्हणून काम केले आणि मग बेल्लारी येथील शासकीय सेवेत प्लेग अधिकारी म्हणून ते रुजू झाले. पण त्यांची देशभक्तीची आस त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. शिक्षणाच्या ओढीने त्यांनी थेट लाहोरमधील अँग्लोवेदिक महाविद्यालय गाठले आणि प्राध्यापक गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली जपानी भाषा आणि इतिहासाचे शिक्षण घेतले. पिंगाली यांनी स्वतःला नॅशनल स्कूलच्या विकासासाठी वाहून घेतले. या ठिकाणी प्राथमिक सैन्यप्रशिक्षण, घोडेस्वारी, इतिहास आणि शेतीविषयी प्रशिक्षण देण्यात येत असे. ते केवळ पुस्तकी ज्ञानाने



समाधानी होणारे नव्हते. त्यांच्या दैनंदिन आचरणातून त्यांचा उदारमतवादीपणा दिसत असे. सन १९१४ मध्ये आपल्या शेतावर स्वेच्छापुरम ही संस्था स्थापन केली.

सन १९१६ ते १९२१ या कालावधीत पिंगाली यांनी सुमारे ३० ध्वजांचा अभ्यास करून त्यांनी भारतीय ध्वजाची कल्पना मांडली. आपल्या तिरंग्याच्या सध्याच्या रूपाचे डिझाईन तयार करण्याचे श्रेय पिंगाली यांना दिले जात असले तरी भारतीय ध्वजाची पाळेपुळे वंदे मातरम् चळवळी पर्यंत जातात. १ ऑगस्ट १९०६ रोजी कलकत्त्यातील पारसी बगान स्क्वेअर-ग्रीन पार्क येथे पहिले ध्वजारोहण झाले. हा ध्वजही तीन रंगांत होता. वरील भागात लाल, मध्ये पिवळा आणि खालच्या बाजूला हिरवा, अशी या ध्वजाची रंगसंगती होती. लाल भागात पांढऱ्या रंगाची आठ कमळाची फुले कोरलेली होती. पिवळ्या भागात निळ्या रंगाने देवनागरी लिपीत बंदे मातरम् असे लिहिले होते. मदाम कामा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सन १९०७ साली पॅरिसमध्ये ध्वजारोहण केले होते. या ध्वजाची रंगसंगतीही पहिल्या ध्वजाप्रमाणेच होती. फरक एवढाच की, पहिल्या पट्टीमध्ये केवळ एकच कमळ होते आणि सप्तर्षी दर्शविणारे सात तारे होते. बर्लिनच्या समाजवादी बैठकीत हा ध्वज फडकविण्यात आला. सन १९१७ मध्ये जेव्हा राजकीय चळवळीने वेग घेतला, त्यावेळी अँनी बेझंट आणि लो.बाळ गंगाधर टिळक यांनी ध्वजारोहण केले होते. या ध्वजाच्या डाव्या बाजूच्या कोपऱ्यात युनियन जॅकचा शिक्का होता. त्याचप्रमाणे पांढऱ्या आकाराचे अर्धवर्तुळ आणि ताऱ्याचे चिन्ह होते. त्यावेळच्या जनतेचे उद्दिष्ट दाखविणे हा त्यामागचा संकेत होता आणि सत्ता मिळविण्याची इच्छा प्रदर्शित करण्यासाठी युनियन जॅकचा शिक्का होता. पण त्या ध्वजावरील युनियन जॅकचे अस्तित्त्व ही राजकीय तडजोड असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली होती. त्यामुळे या ध्वजाचा स्वीकार करण्यात आला नाही. सन १९२१ मध्ये स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व म.गांधीजींकडे आले आणि त्याचवेळी तिरंग्याचे पहिले रूप जनतेसमोर झळकले.

सन १९२१ ते १९३१ ही दहा वर्षे पिंगाली यांच्यादृष्टीनेच नव्हे तर आंध्र प्रदेशमधील स्वातंत्र्य चळवळीचा महत्त्वाचा कालावधी ठरला. ३१ मार्च आणि १ एप्रिल १९२१ या दोन दिवशी बेझवाडा येथे एआयसीसीच्या- ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या ऐतिहासिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याच वेळी पिंगाली वेंकय्या ध्वज घेऊन गांधीजींकडे गेले. भारतातील दोन प्रमुख धर्म दर्शविणारे लाल आणि हिरवा असे दोन रंग यात होते. अशाप्रकारे राष्ट्रध्वज अस्तित्वात आला, पण ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने तो अधिकृतपणे स्वीकारला नव्हता. गांधीजींनी तो स्वीकारल्यानंतर पुढील प्रत्येक काँग्रेस बैठकीमध्ये हा ध्वज फडकविण्यात येत असे. सामान्य माणसाच्या प्रगतीचे प्रतीक असलेल्या चरख्याचा या ध्वजामध्ये अंतर्भाव करण्यात यावा, अशी सूचना जालंधरचे हंसराज यांनी केली. त्यानंतर गांधीजींनी इतर अल्पसंख्यांकांचे अस्तित्व दर्शविणारी पांढरी पट्टी या ध्वजात समाविष्ट केली. १९३१पर्यंत त्याला लोकमान्यता मिळाली नव्हती. ध्वजामधील रंगांचा अर्थ समजण्यावरूनही त्यावेळी जातीय तणाव निर्माण झाला होता. सन १९३१मध्ये कराची येथे भरलेल्या काँग्रेस सभेमध्ये यावरील अंतिम तोडगा काढण्यात आला. शौर्य दर्शविणारा भगवा, सत्य आणि शांती दर्शविणारा पांढरा आणि समृद्धी व विश्वास दर्शविणारा हिरवा, असा या तीन रंगी ध्वजाचा अर्थ लावण्यात आला. चरखा आणि सूत यांच्याऐवजी ध्वजाच्या मध्यभागी अशोकचक्राचा समावेश करण्यात आला. राष्ट्रध्वजातील तीन रंगांचा अर्थ समजावताना सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी सांगितले की, राजकीय नेत्यांनी व्यावहारीक सुखांचा त्याग करणे हे भगवा रंग दर्शवतो, सत्याची वाट दाखवणे हे पांढरा रंग सांगतो तर हिरवा रंग आपले जमिनीशी असलेले नाते दर्शवितो आणि अशोकचक्र हे मानवता धर्माचे प्रतीक आहे. राष्ट्रध्वजाची प्राथमिक कल्पना मांडणारे पिंगाली वेंकय्या यांचे ४ जुलै १९६३ रोजी निधन झाले.

!! भारतीय राष्ट्रध्वज तिरंगाचे जनक पिंगाली वेंकय्याजींच्या पावन जयंती पर्वावर त्यांना विनम्र अभिवादन आणि समस्त भारतीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



विश्वास पाटील
संपर्क क्र. ८३२९७५७८२८

## घरगुती कामगारांच्या समस्यांवरील उपाययोजना

आधुनिक केसरी

**नोकरी, व्यवसाय इ. क्षेत्रात महिलांची भूमिका वाढत जात आहे. त्या प्रमाणात घरकाम करणाऱ्या मदतनीस, स्वयंपाक, लहान मुलांची ज्येष्ठांची देखभाल, नर्सिंग, बागकाम इ. अनेक कामांसाठी महिलांची गरज निर्माण झाली आहे. परंतु अशा लाखो अकुशल घरगुती कामकाज करणाऱ्या महिला असंघटित असल्याने त्यांना कामगार शक्ती म्हणून कोणतीही मान्यता नाही. त्यांच्या कामाची दखल देखील घेतली जात नाही. परंतु त्यांच्या कामाची गरजदेखील कधी नव्हे ती वाढलेली आहे. भारतातील घरकाम करणाऱ्या महिलांची जी सामाजिक, कौटुंबिक परिस्थिती आहे, ती या उपेक्षित वर्गाचे अनेकदा कठोर वास्तव चित्रण करते.**

अनेक घरांचा अविभाज्य भाग बनलेल्या, घरातील कामांची काळजी घेणाऱ्या वर्गाच्या उन्नतीसाठी, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकार, समाजसेवा संस्था, नियोक्ते आणि संपूर्ण समाज यांच्याकडून एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यासाठी नियमन, भेदभाव, शोषणात्मक कामाचे वातावरण, शिक्षण-कौशल्यांचा मर्यादित प्रवेश इ. समस्यांचे निराकरण करावे लागेल. सोबतच अधिक न्याय्य वातावरण, समाजात घरकाम करणाऱ्या महिलांचे अधिकार, सन्मान आणि कल्याण सुनिश्चित करून त्यांच्या सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा करता येऊ शकतो. खालीलप्रमाणे उपाययोजनांची अंमलबजावणी करून असंघटित असलेल्या घरकाम करणाऱ्या महिलांचे सक्षमीकरण करणे शक्य होईल. नियमन आणि कायदेशीर संरक्षण : घरगुती कामगारांचे हक्क आणि कल्याणासाठी सर्वसमावेशक कामगार कायदे व नियमांची अंमलबजावणी व्हावी. वेतन, फायदे व सामाजिक सुरक्षा योजना, निवृत्तीवेतन इ. चा समावेश कायद्यात असावा. जागरुकता आणि शिक्षण : घरकाम करणाऱ्या महिलांबद्दल योग्य वागणूक आणि आदर वाढविण्यासाठी घरकामगारांचे हक्क व सन्मान याबद्दल नियोक्ता व कामगार यांच्यात शैक्षणिक मोहिमांद्वारे जागरुकता निर्माण करावी लागेल. यासाठी कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि प्रसारमाध्यमांचा उपयोग करता येईल. कौशल्य विकास आणि प्रशिक्षण : घरगुती कामगारांची रोजगार क्षमता आणि उत्पन्नवाढीसाठी कौशल्य विकास कार्यक्रमाची आखणी करण्यात यावी. यामध्ये विविध घरगुती कामे, लहान मुलांचे संगोपन, ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणे, स्वयंपाक, प्रथमोपचार, आपात्कालिन परिस्थिती हाताळणी इ. अधिक प्रभावीपणे व व्यावसायिक पद्धतीने करण्यासाठी या कामांचा कौशल्य विकास प्रशिक्षणात समावेश करण्यात यावा. असे प्रशिक्षण सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था किंवा खाजगी संस्थांद्वारे प्रदान केले जाऊ शकते. जॉब प्लेसमेंट सेवा : घरगुती कामगारांना नियोक्त्यासोबत जोडणारे विविध प्लॅटफॉर्म स्थापित करावे. योग्य भरती पद्धती, पारदर्शक करार आणि शोषणापासून संरक्षण सुनिश्चित करणे या प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्म आणि मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करता येऊ शकतो. सामाजिक सुरक्षा आणि विमा : आरोग्य विमा, जीवन विमा आणि सेवानिवृत्ती लाभांसह इतर सामाजिक सुरक्षा लाभ घरगुती कामगारांना मिळण्यासाठी शासन ( केंद्र व राज्य ), मालक व घरगुती कामगार यांनी एकत्रित येऊन सामाईक योजना बनविल्यास घरगुती कामगारांना आर्थिक स्थैर्य मिळेल. कौटुंबिक व मुलांसाठी प्रोत्साहन योजना : घरगुती कामगारांना शासकीय योजनेतून सवलतीच्या दरात घर उपलब्ध करून देणे, त्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण, आरोग्य उपलब्ध करून देण्यासाठी योजना आखणे, लोकसहभाग, कंपन्यांचे सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून घरगुती कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती, प्रगत शिक्षण उपलब्ध होईल यासाठी सर्व समावेशक योजना आखणे आवश्यक आहे. मायक्रो फायनान्स आणि क्रेडिट सुविधा : बँका, मायक्रो फायनान्स इ. द्वारे वाजवी व्याज दरावर सूक्ष्म कर्ज मिळेल व त्याद्वारे लहान व्यवसाय अथवा उत्पन्न वाढविणाऱ्या क्रियाकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यास सक्षम बनविल्यास त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य सुधारण्यास मदत मिळेल. सशक्तीकरण आणि संघटन : रगुती कामगारांच्या संघटना निर्मितीस प्रोत्साहन देऊन चांगल्या कामाची परिस्थिती, वाजवी वेतन, सुधारित कायदेशीर संरक्षणासाठी एकत्रिपणे वाटाघाटी करण्यासाठी सक्षम करणे, धोरणात्मक बदल, विविध स्तरावर घरगुती कामगारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी प्रतिनिधीत्व करणे. वरील उपाययोजना राबविण्यासाठी शासनाचा पुढाकार, विविध स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, नियोक्त्यांमध्ये जाणीवजागृती, घरगुती कामगारांचे संघटन, कंपन्यांचे सामाजिक दायित्व यांचे सामाईक प्रयत्न आवश्यक आहेत. जनजागृतीद्वारे घरगुती कामगारांसाठी आदर आणि सन्मानाची संस्कृती वाढवणे, नियोक्ता आणि संपूर्ण समाजाला घरगुती कामगारांना समान स्थान व सन्मानजनक वागणूक देण्यासाठी व त्यांच्या योगदानाची प्रशंसा करण्यासाठी समाजामध्ये सुयोग्य वातावरण आपण निर्माण करुया.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संभाजी भिडेंचा बोकाळलेला वाचाळपणा थांबणार का ?

## समाजमन अस्वस्थ : आधुनिक केसरी जनचर्चेत संवेदनशील वाचकांच्या सडेतोड प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर : अलीकडेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पितृत्वावर जाहिर शंका घेत आणि त्यानंतर महात्मा ज्योतिराव फुले यांच्याबद्दल अवमानकारक शब्द वापरत श्री शिवप्रतिष्ठानचे सर्वेसर्वा संभाजी भिडे यांनी तोंडसुख घेतले. त्याचबरोबर हे सर्वजण देशद्रोही होते त्यांचे पुरावे माझ्याजवळ आहेत. असा वादग्रस्त व खळबळजनक दावाही संभाजी भिडेंनी केला. संभाजी भिडेंचे असे अनेक वादग्रस्त वक्तव्ये थांबायचे नाव घेत नाहीत त्यामुळेच भिडेंच्या या वक्तव्यांनी समाजमन अस्वस्थ आणि सुन्न होताना दिसत आहे. म्हणूनच भिडेंचा बोकाळलेला वाचाळपणा थांबणार का? या विषयावर आधुनिक केसरी जनचर्चेत संवेदनशील वाचकांनी सडेतोड प्रतिक्रिया दिल्या.**

जनचर्चा

### बोलविता धनी शोधावा लागणार...



प्रा. डॉ. भास्कर पाटील, अकोला

देशाच्या प्रधानमंत्री व राष्ट्रपती यांच्या पेक्षाही देशाचे, धर्माचं संरक्षण करणारे शिवशंभु प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा संभाजी भिडे यांच्यातील वाचाळपणा थांबणार का ? असा प्रश्न उपस्थित करून जी चर्चा घडत आहे. ती अस्वस्थ करणारी आहे. माझं स्पष्ट मत आहे की संभाजी भिडे यांचा वाचाळपणा थांबणार नाही. कारण त्यांचा 'बोलविता धनी' हा दुसराच आहे. व्यवस्था आणि सत्ता ही त्याचे बोलविते धनी असल्यामुळे, तो पोपटाच्या भूमिकेमध्ये काम करणारा एक व्यक्ती आहेत. एकीकडे मणिपूर पेटत आहे, महाराष्ट्राच्या राजकारणाची पातळी कोणत्या दिशेने गेलेली आहे, या सगळ्या घटनांचा परिणाम समग्र सामान्य जनतेवर पडलेला आहे आणि राजकारणी, सत्तालोलूप माणसांबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण झालेली आहे.अशा वेळी जनतेचे, बुद्धिवंतांचे मन आणि विचार विचलित करण्यासाठी एक यंत्रणा सातत्याने कार्यरत असते. त्याचाच एक भाग म्हणजे वाचाळ वीर संभाजी भिडे आहे.

काही ज्वलंत मुद्दे की जे सर्व सामान्यांच्या वेठीस धरणारे आणि त्यांचं शोषण करणारे असतात, त्यावर जनता चिडलेली व भडकलेली असते. त्या त्या वेळेला निर्णय प्रक्रियेत असणारे धूर्त लोक आपल्या उणिवा झाकून ठेवण्यासाठी काही क्रिया नियोजनबद्धपणे करतात. यांची मंत्रिमंडळे देखील स्वहिताची काही विधेयके अशाच काळामध्ये विधिमंडळात पारित करून घेतात. त्यांचे क्रूर कर्म, त्यांची राजकीय अभिलाषा आणि लालसा व त्यांच्याबद्दल झालेलं जनमत लपवून, दडपून टाकण्यासाठी अशा पद्धतीचे काही वाचाळवीर हे व्यवस्थेने, राजकारण्यांनी आणि सत्तेनेच तर तयार करून ठेवलेले पोसलेले नाहीत ना! अशी शंका उपस्थित होण्यास वाव आहे. त्यामूळेच बेमुर्वतपणे भिडे, पोंक्षे सारखे वाचाळवीर बेमुर्वतपणे वाटेल तसे बोलतात, त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळे संभाजी भिडे यांच्या बाबतीत आपण कितीही क्रिया प्रतिक्रिया दिल्या तरी, ठरलेल्या नियमाप्रमाणे, ठरल्यावेळी आपला 'पोपटी वाचाळपणा' चालूच ठेवणार. कारण हेच त्या सगळ्यांना अभिप्रेत आहे. आणि त्यासाठीचा हा एक राखीव बाहुला आहे, आणखीही एक दोन बाहुले आहेत, गरज नसणाऱ्या मुद्द्यांना उकरून, उगीच लोकांना चेतविण्याचे काम हे करतात. त्यांना डोक्यावर घेणारा हा निर्बुद्ध समाज दुसरा तिसरा कुठला नसून तोही आपल्यातीलच आहे आपणच त्यांना त्यांचे कार्यक्रम अरेंज करतो आणि आपलेच भाऊबंद यांच्या विरोधात उभे राहतो आपणच तुरुंगात जातो आणि पोळी शकणारे आपली पोळी शिकून घेतात तेव्हा मला असं वाटतं की अशा या वाचाळ वीरांना अनुलेखाने मारणे हा सगळ्यात मोठा पर्याय आहे. तेव्हाच त्याची वाचा बंद होईल. आपण जितके प्रतिक्रियावादी होऊ, तितके त्यांच्या वाणीतून उगळणारे विष बाहेर येतच राहील. ज्यांना शासनाचं भरपूर संरक्षण, सुरक्षा आहे. त्यांच्या कार्यक्रमांना पोलिसांची दानत आहे. अशा वाचाळ वीरांना आपण बोलण्यापासून रोखू शकू असे मला वाटत नाही.

### हे मानसिक विकृती असलेले व्यक्तिमत्व...




डॉ . अनंता सूर यवतमाळ

नुकत्याच अमरावतीला झालेल्या एका जाहीर सभेत संभाजी भिडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या वडिलांविषयी जे उद्‌गार काढले ते अतिशय खेदजनक आहे.भिडे हे मुद्दाम असे काहीबाही बोलून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असतात. मागे महात्मा फुले यांच्याविषयी अपमानास्पद शब्द वापरुन संभाजी भिडे कोणता मोठेपणा मिळविण्याचा प्रयत्न करतात हे कळायलाच मार्ग नाही.ते मुद्दाम नव्या पिढीला भडकविण्याचा प्रयत्न करून तोंडसुख घेतात आणि तमाशा पहात बसतात. आता लोकांनी एकत्र येऊन त्यांना कायद्याने धडा शिकविण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. लोकांनी या भिडेच्या विरोधात पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली असली तरी ते काही भिडेवर कारवाई करतील असे वाटत नाही. कारण यापूर्वीही अनेकदा भिडेनी समाजसुधारक आणि देशभक्तांच्या बाबतीत अशी विधाने केलेली आहेत आणि पोलिस मूग गिळून गप्प बसले आहेत.

किमान आतातरी त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी.अन्यथा ते मोकाट सुटलेल्या सांडासारखे काहीही बोलत सुटतील आणि आम्ही कमरेवर हात ठेवून निमुटपणे पाहात बसू!खरे तर आपण ज्या व्यक्तींविषयी बोलतो ते बोलत असताना भिडेसारख्या व्यक्तीने जिभेवर नियंत्रण ठेवायला हवे. ज्या देशाने आणि जगाने महात्मा गांधीच्या अहिंसेचा स्वीकार केला त्या व्यक्तीमत्त्वाच्या बापाविषयी भिडेसारख्या माणसाला बोलण्याचा काय अधिकार आहे.आपण कोण आहोत हे व्यक्तीने पहिल्यांदा ओळखले पाहिजे आणि त्यानंतरच दुसऱ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर बोलण्याचा अधिकार आपण प्राप्त केला पाहिजे. महात्मा गांधींविषयी काहीही बोलण्याची आपली लायकी नसताना आपण त्यांच्यातील नसलेले दोष लोकांसमोर जगजाहीर करणे हे कितपत योग्य आहे. भिडे जिथे जातात तिथे लोकांमधील चांगल्या गोष्टी शोधण्यापेक्षा वाईट गोष्टी लोकांपर्यंत सांगून लोकांना सांगून भडकविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न दिसतो. त्यामुळे भिडेने महात्मा गांधींचा केवळ अपमानच केला नाही तर त्यांच्या विचारांचा आणि या देशावर केलेल्या उपकारांचाही अपमान केलेला आहे. लोकांचा भावनांशी खेळण्याचा ते मुद्दाम प्रयत्न करतात.अशा माथेफेरूचा लोकांनी कडाडून विरोध केला पाहिजे असे वाटते.




### जातीय अभिनिवेशची शृंखला तोडावी...



वसंत राठोड, मुंबई.

स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी साजरी करीत असताना गतकाळात डोकावून बघणे गरजेचे झाले आहे. पारतंत्र्याच्या जोखडातून मग ते स्वातंत्र्याच असो,स्त्री शिक्षण असो,जातीय तेढ निर्माण असो,धर्मांधता असो,स्त्री पुरुष असमानता असो, असे एक ना अनेक आव्हाने समोर असताना त्यातून बंधनमुक्त होण्यासाठी अनेक थोर समाजसुधारक आपापल्या परीने योगदान दिलेले आहे हे कोणी विसरता कामा नये.

परंतु,काही प्रवृत्ती अधून मधून डोकं वर काढून द्वेष मूलक करण्याचा प्रयत्न करतात. थोर व्यक्ती वर अकारण स्तोम माजवले जात आहे. त्यांनी केलेल्या योगदानाची, बलिदानाची, समाजसुधारणा व जातिविरहित श्रेयाची दखल न घेता आपल्या सोयीनुसार काही विशिष्ट समाजात द्वेष पसरविण्याचे काम करतात. अशा अपप्रवृत्तींना खत पाणी घालण्याचे काम काही राजकीय पक्ष, लोकं करीत आहे ? हे सत्य विसरून चालणार नाही असं लोकांना वाटतं. इतिहास पुसून नवा इतिहास घडविण्यासाठी जिगर लागतं.त्यात धमक असावी लागते. इतिहासाची विकृत मांडणी व विवेकवादी विज्ञाननिष्ठा याला तिलांजली देऊन समाजात दुही निर्माण करताहेत. विशुद्ध व मानवी भावनेने सत्कार्य करा .जातीय ध्रुवीकरण करून समाजात तेढ वाढवून एकमेकाप्रती असूया,दरी वाढविण्याचा प्रयत्न करू नका. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारसुध्दा समाजाला एकत्रित ठेवणारे आहेत हे विसरू नका. द्वेष मूलक,जात निहाय,धर्मांधता यावर विखारी मत मांडण्यापेक्षा' ज्योती 'ने तयार झालेली मशाल तसेच सहृदयाची बंधू भाव याची ' फुले ' वेचता आली तर बघा.

### अशी प्रवृत्ती वेळीच ठेचून काढली पाहिजे..




प्रा. डॉ. सतीश मस्के, धुळे

संभाजी भिडे वादग्रस्त विधाने करून इतिहासाची मोडतोड करत आहे. जातीयता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. महात्मा गांधी, महात्मा फुले, महापुरुष, समाज सुधारकाबाबत व देशाच्या तिरंग्याबाबत बेताल, वादग्रस्त वक्तव्य करून समाजात जातीय, धर्मिय तेढ निर्माण करत आहे. हे अतिशय वाईट आहे. सरकार मात्र गपचूप आहे. सरकारही हिंदुत्व हिंदुत्व करून समाजात विषमता व दुही निर्माण करत आहे. त्यामुळेच अशा प्रवृत्त्या वाढत आहेत. त्यांच्या वक्तव्याने समाजात जाती जातीत तेढ निर्माण होत आहे. सारं वातावरण गढूळ आणि विषमतामय करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. त्यामुळेच की काय सरकार आशा विषारी माणसाकडे दुर्लक्ष करून पाठीशी घालत आहे. दुसरीकडे साधं कुणी काही बोलले लिहिले की त्याला सरकार देशद्रोही ठरवत आहे. भिडेंना मात्र मोकळीक दिली आहे की काय अशी शंका यायला लागली आहे. त्याला वेळीच आवर घालायला हवे परंतु तसे होताना दिसत नाही. उलट मोकार आणि मोकाट सोडले आहे. खरे तर या देशात चोर सोडून संन्याशालाच फाशी होताना दिसत आहे. अशामुळे समाजामध्ये अस्वस्थता निर्माण होत असून सर्वसामान्य माणसांचे जगणे अवघड झाले आहे. सरकार व अशा प्रकारची बेताल वक्तव्य करणारी माणसेच खऱ्या अर्थाने समाजात, देशात जातीय,धर्मीय विष पेरत असतील तर न्याय कुणाला मागायचा हा प्रश्न आहे. सध्या सगळ्या क्षेत्रात सरकारमधील लोकप्रतिनिधी बेताल वक्तव्य व अनैतिक वर्तन करून देशभर अस्थिरतेचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यांच्या अशा अनैतिक वर्तणुकीचे पडसाद समाजात दिसून येत आहेत. मणिपूर सारखी घटना घडणे अतिशय वाईट आहे.माणुसकीला काळीमा फासणारी आहे.देशाची मान शरमेनं खाली जाणारी आहे पण राजकारणी मतापुढे आंधळी झाली आहेत. गलिच्छ राजकारण करत आहेत. म्हणून प्रत्येकाने सजग राहणे, अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध आवाज उठविणे आणि आशा प्रवृत्ती वेळीच ठेचून काढणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. ते सरकारने जपून भारतीय संविधानानुसार अशा प्रवृत्तींना वेळीच ठेचून काढले पाहिजे. जनतेचे समाजाचे व देशाचे हित जपले पाहिजे.

महाराष्ट्र Business Katta













# बालसाहित्याचा प्रचार काळाची गरज



उद्धव भयवाळ
संपर्क क्र. ८८८८९२५४८८

आधुनिक केसरी

**मुलांनी खूप वाचन केले पाहिजे, असे आपण सगळेच जण म्हणतो. खरे म्हणजे आजची मुले खूप भाग्यवान आहेत. सुंदर छपाई केलेली, आकर्षक रंगांमधील अनेक प्रकारची पुस्तके आज त्यांच्यासाठी उपलब्ध आहेत. पण मुले वाचत नाही अशी तक्रार असते. मुले पुस्तके वाचत नाहीत याला अनेक कारणे आहेत. टी.व्ही. वरील कार्टून तसेच टॅब आणि मोबाईलवरील गेम्स यातच त्यांचा वेळ खर्च होतो. यातून त्यांनी बाहेर पडायला हवे आणि पुस्तके वाचायला हवीत. कारण पुस्तके वाचण्याचा आनंद वेगळाच असतो.**

मुलांसाठी निर्माण केलेले जे बालवाङ्मय आहे; त्या कथा असतील, कविता असतील किंवा छोटीशी कादंबरी असेल, त्यांच्या वाचनाची गोडी त्यांना लागायला हवी. वाचनाची ही गोडी मुलांना कशी लावता येईल यावर विचार व्हायला हवा.

मानवी जीवनात बालसाहित्याचे स्थान मोलाचे आहे. महत्त्वाचे आहे. बालब्रह्माच्या रंजनाचे, प्रबोधनाचे महत्त्वाचे साधन म्हणजे बालवाङ्मय होय. सूर, ताल, लय, हे त्रिदल म्हणजे बालसाहित्याचे प्राणतत्त्व. मुलांना जे आवडते, ज्याचे आकलन होते ते बालवाङ्मय. करील रंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयाचे" असे साने गुरुजी म्हणत. तेच जीवनमूल्य स्वीकारून त्यांनी जन्मभर लेखन केले. महाराष्ट्रभर फिरून मुलामुलींना कथा सांगितल्या. कविता म्हटल्या. त्यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकाने मातृत्वाच्या महन्मंगल स्तोत्राचा आदर्श उभा केला. या पुस्तकाने मागील शतकात मुलांच्या भावविश्वाचा ठाव घेतला. अधूनमधून चर्चा ऐकू येते की, "श्यामची आई" आता कालबाह्य झाली आहे. पण "श्यामची आई" कधीही कालबाह्य होणार नाही हे त्रिकाल सत्य आहे. तेव्हाच्या काळापेक्षा आजचे समजजीवन आणि सामाजिक संदर्भ खूपच बदलले आहेत, हे खरे असले तरीही समाजाच्या आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी सामाजिक जाणीवा समृद्ध असणे आवश्यक असते; आणि त्यासाठी संवेदनशील बालमनाचे भावविश्व फुलवले गेले पाहिजे. ते फुलवले जाण्यासाठी 'श्यामची आई' तसेच इतर बालवाङ्मय मुलांपर्यंत पोचणे आवश्यक आहे. म्हणूनच बालवाङ्मयाचा प्रचार आणि प्रसार ही काळाची गरज आहे. ना. धों. ताम्हणकरांच्या गोट्या आणि चिंगी या जोडीने १९५० ते ६० या काळातील मुलांच्या भावजीवनाला खतपाणी पुरवले. १९६० नंतर भा.रा. भागवत यांच्या फास्टर फेणे या किशोराने धमाल उडविली; आणि मुलामुलींपुढे नवीन आदर्श उभे केले.

मुलांना जन्मतःच प्राप्त झालेल्या सहजप्रवृतीचे उदात्तीकरण होऊन त्यांची आत्मकेंद्री वृत्ती बदलावी आणि सामाजिकता वाढीस लागावी यासाठी बालसाहित्याचा चांगला उपयोग होतो. गोष्टी, गाणी, कविता यांच्याद्वारे मुलांच्या मनाच्या पाकळ्या उमलू लागतात आणि हळूहळू ते फूल विकसित होत जाते. बालसाहित्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे जिज्ञासापूर्ती. कोण ? काय ? कसे ? कधी ? असे प्रश्न मुलांनी विचारलेच पाहिजेत. त्यांच्या जागृत मनाचे, विचारशील वृत्तीचे ते द्योतक आहे. जिज्ञासा ही सहजप्रवृत्ती आहे. बालवाङ्मय जिज्ञासापूर्तीचे काम उत्कृष्ट रीतीने करू शकते. बालवाङ्मय हे संस्काराचे उत्कृष्ट साधन आहे. प्रभावी मध्यम आहे. पण हे संस्कार अगदी अनौपचारिक रीतीने व्हायला पाहिजेत. संस्कार दिसले नाहीत तरी जाणवले पाहिजेत.





बालसाहित्यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते. चांगल्यावाईटातील फरक, गुणांचा गौरव, दुर्गुणांबद्दल चीड, प्रसंगावधान इत्यादी गुणांचा विकास चांगल्या वाचनानेच होतो. मुलांमधील सर्जनशीलता जागृत करणे, तिचा विकास करणे, हे बालसाहित्याचे महत्त्वाचे प्रयोजन असते. सर्जनशीलता या गुणाने विश्वात अनेक चमत्कार घडविले आहेत. शास्त्रज्ञ, संशोधक, साहित्यिक, कलावंत, नर्तक, चित्रकार हे सारे सर्जनशील असतात. त्यांच्या हातून जी निर्मिती होते त्याला सृजन म्हणतात. नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सर्जनशील विचारांची गरज असते. स्वतंत्र विचार, आत्मविश्वास, ध्येयासक्ती, सातत्य ही सृजनशीलतेची वैशिष्ट्ये आहेत. म्हणूनच बालवाङ्मयाच्या माध्यमातून सर्जनशीलतेच्या पाऊलखुणा स्पष्ट झाल्या पाहिजेत.

आज टी.व्ही.चा घरोघरी प्रभाव आहे. टी.व्ही. गेम्स, इंटरनेट, अशी ज्ञानरंजनाची अनेक साधने सज्ज आहेत. त्यामुळे वाचनाची आबाळ होते की काय अशी शंका भल्याभल्यांना वाटते. त्यामुळेच वाचनसंस्कृती कमी होत असल्याची तक्रारही सातत्याने होत असते. पण दरवर्षी भरणाऱ्या ग्रंथप्रदर्शनातील पुस्तकविक्रीकडे बघितले तर वाचनसंस्कृतीचा लोप होत आहे, ही तक्रार खरी वाटत नाही. गावोगावच्या ग्रंथजत्रा, फिरती पुस्तकप्रदर्शने, हजारो पुस्तके पाहण्याची संधी उपलब्ध करून देत आहेत. आज बदलत्या तंत्रज्ञानाच्या या युगातील मुलांची वाचनाची भूक भागवायची असेल तर कसदार बालवाङ्मयाची निर्मिती, प्रचार आणि प्रसार आवश्यक आहे. नवनव्या प्रकारच्या पुस्तकांसाठी मुळे आतुर आहेत, हे आपण लक्षात घेतले पाहिजे आणि म्हणूनच बालसाहित्याकडे गंभीरपणे पाहिले पाहिजे.

बालवाङ्मय म्हणजे एक दुर्लक्षित साहित्यप्रकार न वाटता नव्या दमाने कसदार लिखाण झाले पाहिजे आणि हे लिखाण मुलांपर्यंत पोचले पाहिजे असे मला वाटते. जगभरातील प्रकाशक नव्या दमाच्या प्रतिभावंत, कल्पक लेखकांच्या शोधात आहेत. हॅरी पॉटरचा सोबती त्यांना हवा आहे. प्रत्येक देशाला, प्रत्येक समाजसमूहाला आपला हिरो हवा आहे. तो निर्माण करण्याचे आव्हान आज सर्वांसमोर आहे. बालसाहित्य हे खऱ्या अर्थाने आज विश्वसाहित्य बनले आहे. म्हणूनच बालसाहित्याच्या प्रचारासाठी आणि प्रसारासाठी जे जे शक्य आहे, ते ते केले पाहिजे. ही काळाची गरज आहे.

# प्रतिभावंत साहित्यिक : अण्णाभाऊ साठे




सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**तुकाराम भाऊराव ऊर्फ शिवशाहीर अण्णा भाऊ साठे ह्यांचा जन्म १ ऑगष्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील वाटेगाव या लहान गावात झाला. अण्णांनी आपले उभे आयुष्य मुंबईच्या चिरागनगर झोपडपट्टीत काढले. याच झोपडपट्टीत अण्णा भाऊंच्या एकापेक्षा एक श्रेष्ठ कलाकृतींची निर्मिती झाली. अण्णा भाऊंची निरीक्षण शक्ती अत्यंत सूक्ष्म होती. नाट्यमयता हाही त्यांच्या लेखनशैलीचा आगळा-वेगळा गुण. ज्या उपेक्षितांच्या जीवनातून अण्णा भाऊंनी अनुभूती घेतली, त्यातील क्षणाचा वेग आणि आवेग त्यांच्या लेखनात जाणवत राहतो.**

लेखनातील लवचिक भावचित्रे अंगासरशा मोडीने साकार करण्याची त्यांची लकबही स्वतंत्र आहे. लेखन शैलीवर त्यांनी सर्वस्व अर्पण केलं होतं. शाळेची पायरीदेखील न चढलेल्या अण्णा भाऊ साठे यांनी मराठी साहित्यातील लोकवाङमय, कथा, नाट्य, लोकनाट्य, कादंबऱ्या, चित्रपट, पोवाडे, लावण्या, वग, गवळण, प्रवास वर्णन असे सर्वच प्रकार सशक्त व समृद्ध केले. त्यांनी ३७ कादंबऱ्या, १९ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, ११ पोवाडे, ३ नाटके, शेकडो गाणी, लावण्या, छकडी अशी विपुल साहित्यसंपदा निर्माण केली आहे; ही खरोखरी अचंबित करणारी गोष्ट आहे. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्वपूर्ण ठरलेल आहे. अजरामर अशा या साहित्याने उपेक्षितांच्या अंतरंगाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला. उपजत बुद्धिवादी म्हणून त्यांच्या साहित्याचा धांडोळा घेता येतो. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. अनेक नामवंत साहित्यिकांच्या वाट्याला त्यांच्या हयातीत उपेक्षाच आली. जशी महात्मा जोतीराव फुले यांच्या वाङ्मयाची त्यांच्या काळात उपेक्षा झाली, तशीच उपेक्षा अण्णाभाऊ साठे यांचीही झाली. अण्णाभाऊंचे साहित्य रूपवादी, रंजनपर, परधार्जिणे आणि भडक आहे, ते साहित्यबाह्य प्रेरणेवर आधारलेले आहे अशी टीका झाली. मराठी कादंबरीचे शतक लिहिणाऱ्या कुसुमावती देशपांडे यांनी तर कोण हे अण्णा भाऊ साठे ? असा प्रश्न केला होता. होय, अण्णा भाऊ सामाजिक बांधिलकी मानणारे, समाजपरिवर्तनाचे शस्त्र हाती घेऊन लेखन करणारे साहित्यिक होते. कम्युनिस्ट चळवळीशी त्यांचा जवळून संबंध होता. पण सर्वसामान्य कष्टकरी, दलित, उपेक्षित आणि धर्मव्यवस्थेने हक्क नाकारलेले स्त्री-पुरुष हे त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी होते. समीक्षकांना त्यांचे साहित्य प्रचारकी, रंजनपर वाटले असेल, पण हजारो वाचकांनी त्यांच्या कथा-कादंबऱ्यांची अक्षरशः पुनःपुन्हा पारायणे केली. त्यांच्या साहित्यात संघर्ष विद्रोह प्रकर्षाने जागोजागी जाणवतो. त्यांची पात्रे शोषित दलित जनतेची दुःखे वाचकांपर्यंत वास्तवपणे पोहोचवतात. त्यांच्या निळू मांग, मकुल मुलाणी, भोमक्या, फुला, नरसु, दादा न्हावी या पात्रांनी सा-या महाराष्ट्राला वेड लावले, झपाटून टाकले. त्यांच्या साहित्यातून प्रगट झालेली त्यांची सर्वसामान्य माणसांविषयीची आंतरिक तळमळ व त्यांच्या सुखदुःखाचे चित्रण करण्याची ओढ वाचकांच्या मनाला भुरळ घालत असे. वाचनीयता हे तर त्यांच्या साहित्याचे महत्वाचे वैशिष्ट्य होतेच, पण त्याचबरोबर मराठी मनाचा आणि महाराष्ट्रीय सांस्कृतिक विशेषांचा अत्यंत मनोज्ञ आविष्कार त्यांच्या कथा- कादंबऱ्यादी सर्वच लेखनातून समृद्ध स्वरूपात झालेला असल्याने, त्यांच्या साहित्याला वाचकांची अधिक पसंती असे.

अण्णा भाऊंचे वेगळेपण म्हणजे त्यांनी कुठलेही औपचारिक शालेय शिक्षण घेतले नव्हते. त्याबाबत ते एका ठिकाणी म्हणतात, 'जे मी स्वतः जगलो आहे, पाहिलं आहे आणि अनुभवलं आहे, तेच मी शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या साहित्यातील बऱ्याच व्यक्तिरेखा मला प्रत्यक्ष भेटलेल्या आहेत. अण्णा भाऊंच्या साहित्यातील वैविध्य, भाषेवरील पकड पाहिली की कोणीही अचंबित होईल एवढे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. सुरुवातीस लोकयुद्ध', 'युगांतर'मध्ये त्यांनी वृत्तांत लेखन, मुलाखती, लेख लिहिले. 'वाट्टेल ते' आणि 'हवे ते' ही सदरे लिहिली. 'मराठा' सारख्या दैनिकातही लेखन केले. पहिली कथा कम्युनिस्ट पक्षाच्या 'मशाल' साप्ताहिकात लिहिली. अण्णा भाऊंनी आपल्या अनेक कथांमधून सामाजिक-राजकीय, धार्मिक, कौटुंबिक समस्यांना तोंड फोडले. स्वतंत्र बाण्याच्या बंडखोर नायिका व तळच्या जात-वर्गातील लढाऊ नायक त्यांनी निर्माण केले. त्यांच्या 'बंडवाला' या कथेत जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध लढणारा मांग समाजातील तरुण आहे. 'रामोशी' या कथेत यदू रामोशी हा जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध आणि भ्रष्ट सरकारी यंत्रणेविरुद्ध कसा संघर्ष करतो याचे चित्रण आहे. 'कोंबडीचोर'मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही दारिद्र्य, उपासमार शिल्लक राहिल्याने गरिबीमुळे सामान्य माणूस कसा चोरी करण्यास मजबूर होतो याचे चित्रण आहे. 'बरबाद्या कंजारी' या कथेत मुंबईच्या झोपडपट्टीतील भटक्या समाजाची दयनीय अवस्था व जात पंचायतीच्या अमानुष प्रथांचे दर्शन घडते. या जात पंचायतीला आव्हान देऊन बरबाद्या व त्याची मुलगी कशी बंडखोरी करते याचे चित्रण आहे. अण्णा भाऊंच्या 'गजाआड' या कथासंग्रहातील अनेक कथा त्यांना जे तुरुंगात कैदी भेटले त्यांच्यातील संवेदनशील माणसांवरील मजबुरीचे दर्शन घडवितात. 'जिवंत काडतूस' या कथेत ते १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्यलढयातील त्यांच्या मित्राच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकतात. अण्णाभाऊंनी त्यांच्या आयुष्यातील काही वर्षे मुंबईच्या घाटकोपरमधील चिरागनगर या झोपडपट्टीत घालविली. तेथील गरीब, व्यसनी, व्यभिचारी, चोऱ्यामाऱ्या करणाऱ्या, गुंड, मवाली, उपेक्षित, भटक्या माणसांचे जगणे, त्यांचा जीवनसंघर्ष अण्णाभाऊंच्या 'चिरागनगरची भुतं' या संग्रहातील कथांत आढळतो. 'स्मशानातील सोनं' ही त्यांची कथा देशातील वंचितांची विदारक मांडणी करून त्या दुःखाच्या परिमार्जनातील सामूहिक जबाबदारीची संवेदना मांडते. 'मरीआईचा गाडा' या कथेत अंधश्रद्धेला आव्हान देण्याचे काम या कथेतील नाना नावाचे पात्र करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील चळवळीमुळे दलित-अस्पृश्य समाजात जे नवे आत्मभान आले त्याचेही चित्रण अण्णा भाऊंच्या 'वळण', 'सापळा' या कथांमध्ये आढळते. दलितांनी मेलेल्या गुरांची विल्हेवाट लावणे, त्याचे मांस खाणे थांबवावे असा संदेश डॉ. बाबासाहेबांनी दिला होता. त्या संदेशामुळे महाराष्ट्रातील अनेक गावांत तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली होती, अनेक गावांत दलितांना बहिष्काराला तोंड द्यावे लागले होते. अनेक दलितांना मृत मांस खाण्याच्या जुन्या सवयी सोडणेही जड जात होते. या द्वंद्वाचे चित्रणही अण्णाभाऊंच्या 'वळण', 'सापळा' सारख्या कथांत आढळते. भारतीय समाजातील जातीय उतरंडीमुळे चांभार- मांग समाजातही कशी श्रेष्ठ-कनिष्ठ भावना वाढीस लागते याचे चित्रण 'उपकाराची फेड' या कथेत पाहायला मिळते.



अण्णाभाऊंनी आपल्या लेखनकाळातील अल्पायुष्यात ३० पेक्षा अधिक कादंबऱ्याही लिहिल्या. त्यापकी सात कादंबऱ्यांवर मराठी चित्रपटही नामवंत दिग्दर्शकांनी काढले. 'फकिरा' या कादंबरीला १९६१ साली राज्य शासनाच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कारही मिळाला आणि तत्कालीन ज्येष्ठ साहित्यिक वि.स.खांडेकर यांनीही कादंबरीचे कौतुक केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरा' मध्ये भीषण दुष्काळाच्या काळात ब्रिटिशांचे खजिने, धान्य लुटून गरिबांना, दलितांना वाटप करणाऱ्या फकिरा या मांग समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण आहे. 'फकिरा' ही कादंबरी ब्रिटिश जुलमी राजवटीच्या विरोधात भारतीय जनतेचा प्रातिनिधीक हुंकार मांडते. 'वैजयंता' कादंबरीत प्रथमच तमाशात काम करणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण केले आहे. न्यायाधिष्ठित समाजरचनेचा आग्रह अण्णा भाऊंच्या संपूर्ण साहित्यात ओतप्रोत भरला आहे. 'माकडीचा माळ' ही भटक्या-विमुक्त समाजाच्या जीवनपद्धतीचे अतिशय सूक्ष्म चित्रण करणारी भारतीय साहित्यातील पहिली कादंबरी आहे. परंतु तिचीही योग्य नोंद तथाकथित समीक्षकांनी घेतली नाही. त्यांनी आपल्या गाण्यांतून, पोवाडयांतून अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांना वाचा फोडली. बंगालचा दुष्काळ, तेलंगणा संग्राम, पंजाब-दिल्लीचा पोवाडा, अंमळनेरचे हुतात्मे, काळ्या बाजाराचा पोवाडा, संयुक्त महाराष्ट्र चळवळीवरील मुंबईची लावणी, माझी मैना, कामगार चळवळीवरील 'एकजुटीचा नेता' ते हिटलरच्या फॅसिझम विरोधात स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बलनचा पोवाडा, चिनी क्रांतीवरील 'चिनी जनांची मुक्तिसेना' गौरवगान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील गाजलेले 'जग बदल घालूनी घाव-सांगुनी गेले मला भीमराव' हे गाणे अशी अनेक गाणी, कवने, पोवाडयांतून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले आहे. तमाशा या कलेला लोकनाट्याची प्रतिष्ठा मिळवून देण्याचं श्रेय अण्णा भाऊंना दिले जाते. तमाशाबंदीच्या कचाट्यातून सुटण्यासाठी अण्णाभाऊंनी लोकनाट्य; ही संज्ञा वापरली आणि अकलेची गोष्ट, खापऱ्या चोर, देशभक्त घोटाळे, शेटजीचे इलेक्शन, माझी मुंबई इत्यादी लोकनाट्ये लिहून तो शब्द रूढ केला. या लोकनाट्यातून आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्न त्यांनी मांडले. भांडवलदार, शेतकऱ्यांचे शोषण करणारे सावकार, शेटजीभटजी हे त्यांच्या टीकेचे लक्ष्य होते. धोंड्या नावाचे एक पात्र निर्माण करून अक्षरशः पुंजापतींच्या वृत्तीप्रवृत्तींवर दगड भिरकावले. प्रबोधन करून परिवर्तन घडविले. वर्गयुद्ध घडविले, सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध उभे राहण्याचे सामर्थ्य मराठी माणसांना दिले. कलानंदाचा आनंद देण्याबरोबरच मराठी मनावर संस्कार केले. अण्णा भाऊंनी आपल्या पुरोगामी-समतावादी, वैज्ञानिक विचारांनी पारंपरिक, पौराणिक तमाशाच्या गण-गवळण ढाच्यातही आमूलाग्र परिवर्तन केले. तमाशाच्या प्रारंभी होणाऱ्या गणेश वंदनालाही त्यांनी फाटा दिला आणि प्रथम वंदू भूचरणा व छत्रपती शिवाजी राजासारख्या शूर पुरुषाला वंदन केले. थोडक्यात त्यांनी देवाऐवजी माणसाला वंदन करण्याची नवी प्रथा पाडली. तमाशात गवळणींची जी अश्लील भाषेत टिंगल-टवाळी चालायची तिलाही त्यांनी काट दिला. अण्णाभाऊंनी महात्मा फुल्यांच्या सत्यशोधकी जलसा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील आंबेडकरी जलसाची जनप्रबोधनाची क्रांतिकारी परंपरा नव्या लोकनाट्यातून पुढे नेली. त्यांनी मराठी व भारतीय साहित्य-संस्कृतीच्या उच्चभ्रू पांढरपेशी कक्षा रुदावल्या. त्यामुळे अण्णा भाऊंचे साहित्य इंग्रजी, हिंदी, रशियन, फ्रेंच, झेक आदी जागतिक भाषांतही अनुवादित झाले. मराठीतील ज्येष्ठ साहित्यक व दलित साहित्याचे प्रवर्तक बाबुराव बागूल यांनी अण्णाभाऊंची तुलना सुप्रसिद्ध रशियन साहित्यिक मॅक्झिम गॉर्की यांच्याशी केली आणि 'महाराष्ट्राचा मॅक्झिम गॉर्की' असा गौरव केला. रशियाच्या इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटी च्या निमंत्रणावरुन ते १९६१ साली रशियात गेले. त्यांवर त्यांनी लिहिलेले प्रवासवर्णन लोकप्रिय झाले. त्यांचे व्यक्तिमत्व विविध कलागुणांनी भरलेले होते. ते उत्तम अभिनय करीत. हातात डफ घेऊन शाहिरी कवने मोठ्या तडफेने गात. बुलबुल, बासरी, हार्मोनियम अशी वाद्येही ते वाजवीत. दांडपट्टा फिरवीत. शिवाय स्वतःच्या लिखाणाव्यतिरिक्त त्यांनी नवयुग, युगांतर आणि आचार्य अत्रेंच्या मराठा वर्तमानपत्रातून अनेक लेख व पुस्तकांची परीक्षणे लिहिली. अण्णाभाऊंचा शेवटचा काळ मात्र हलाखीत गेला. दारिद्र्य आणि एकाकी आयुष्य त्यांच्या वाट्याला आले. मराठी साहित्यातील प्रतिष्ठांकडून त्यांची तशी उपेक्षाच झाली. विपन्नावस्थेत गोरेगावच्या सिध्दार्थनगरात त्यांचे निधन झाले. अण्णा भाऊ साठे हे एक झपाटलेले लेखक होते. अवतीभोवती पसरलेले अफाट दुःख, दारिद्र्य व अज्ञान हेच त्यांच्या चिंतनाचे व लेखनाचे विषय होते. केवळ वीस वर्षांच्या कालावधीत त्यांनी हे साहित्य निर्माण केले. त्यापैकी बरेच साहित्य प्रसिद्ध झालेले असले तरी अजूनही बरेच साहित्य अप्रकाशित आहे किंवा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. संघर्ष हा अण्णा भाऊंच्या साहित्याचा प्राणबिंदू आहे. संघर्ष कशासाठी ? कुणासाठी ? व कुणाविरुद्ध हे प्रश्न ओघाने आलेच. अण्णा भाऊंच्या कथा-कादंबर्यांमधला संघर्ष शोषण आणि व्यवस्थेच्या विरुद्ध आहे. तो दलित-पीडित- शोषित-वंचितांसाठी आहे. तो त्यांना न्याय व सन्मान मिळवून देण्यासाठी आहे. शोषणमुक्ती हा त्यांचा ध्यास होता. केवळ महाराष्ट्र नव्हे तर साऱ्या पृथ्वीच्या पाठीवरील सर्व कष्टकरी, दलित, शोषित, पीडित यांचे शोषण संपविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. वर्गविरहित समाजाचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी आपले सारे आयुष्य पणाला लावले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लोकमानसात रुजविण्याचे महत्वपूर्ण काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर द.न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र यांच्यासह सीमा प्रदेशातील विविध भागांतील हजारो ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले. त्याच्यामुळे लोक प्रेरित झाले. खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ साठे ध्येयवादी लोकशाहीर, प्रतिभावंत साहित्यिक होते.

# कामगारांचे दु:ख मांडणारे साहित्यसम्राट




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300


आधुनिक केसरी

**अण्णा भाऊ साठे यांचे नाव जरी उच्चारले तरी आपोआप नावा अगोदर साहित्य सम्राट अशा शब्द येतोच. कारण अण्णा भाऊ साठे अर्थात तुकाराम भाऊराव साठे हे वास्तववादी साहीत्यीक तर आहेतच परंतु कोणत्याही प्रकारचे शिक्षण नसताना पाट्या वाचुन अक्षर ओळख करून घेतली व आपल्या साहित्यात कामगारांचे दु:ख मांडून कामगारांचा आवाज उठवण्याचे काम केले. शिक्षणाचा गंध नसणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांच्या साहीत्यावर आज लोक संशोधन करत आहेत ह्या पेक्षा मोठा गौरव आणि प्रभावी साहित्य काय असु शकते याची प्रचिती येते.**

पस्तीस कांदबऱ्या, पंधरा कथा कथा संग्रह, कविता संग्रह, पटकथा, नाटके, पोवाडे असा साहित्याचा डोंगर उभा करून भल्या भल्यांना घाम फोडणारे कष्टकरी जनतेचा आवाज असलेले साहित्य अण्णा भाऊ साठी निर्माण केले. हलाखीच्या परिस्थिती मुळे कामाची जबाबदारी व काम करता करता अक्षर ओळख करून कामगारांचे दुःख मांडण्याणे साहित्य निर्णाम करणे म्हणजे हि साहित्यिक क्रांतीच होती. परंतु भारता मध्ये हजारो वर्षांपासून चालत आलेली विषमता, द्वेष व जातीवाद यामुळे अनेक वेळा गुणवत्ता असतानाही केवळ जात, धर्म यामुळे कर्तृत्वाला डावलणे नवीन नाही. म्हणून गुणवत्ता, प्रंचड साहित्य असताना ही पाहिजे तो न्याय अण्णाभाऊ साठे यांना साहित्य क्षेत्रात मिळाला नाही. अण्णाभाऊ साठे यांच्या लिखाणात ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य मानसाची जिवन जगण्यासाठी होणारी धावपळ, येणाऱ्या अडचणी याची सविस्तर मांडणी आढळते. ग्रामीण भागामध्ये जातीधर्माच्या आधारावर कामगाराची केलेली अवहेलना व शहरी भागात भांडवलदारांकडून केले जाणारे आर्थिक व श्रमिक शोषण हे कामगाराच्या शोषण विषयी माहिती देते. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे काल्पनिक किंवा अलंकारिक नसुन सत्याची जाण करून देणारे आहे. फकिरा सारख्या कांदबरीमधुन जिवनाचे मार्मिक वर्णन करून सत्यता मांडली आहे. 'माझी मैना गावाकडे राहली माझ्या जिवाची होते या काहीली' सारख्या कवितेमधून पोटाची खळगी भरण्यासाठी गावाकडून शहरात जावे लागते परंतु गावातील माणस, प्रेम जिव्हाळा आठवणी नेहमी माणसाला गावाची ओढ निर्माण करून देत असतात. कामासाठी स्थलांतरीत कामगाराची काय अवस्था असते, भांडवलदार माणसाला यंत्र कसे बनवतात याचे ह्रदयस्पर्शी पण वास्तविक वर्णन अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात आहे. सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी राजकीय सत्ता गांभीर्याने घेत नाहीत. कामगारांचे, मजुरांचे शोषण खुप मोठ्या प्रमाणात केले जाते. कष्ट करूनही लोकांच्या पोटाला खायला मिळत नाही हे भयानक सत्य मांडण्याचे धाडस केवळ अण्णाभाऊ साठे करू शकतात.



देशाला ब्रिटीशांकडून स्वातंत्र्य मिळाल्याच्या दुसऱ्याच दिवशी आझाद मैदानावर जाहीर सभा घेऊन 'ये आझादी झुठी है देश की जनता भुखी है' म्हणत स्वातंत्र्यानंतर तरी किमान पोटाला भाकर मिळेल का हा थेट सवालच अण्णाभाऊ यांनी या व्यवस्थेला होता. परंतु आपण आजची परिस्थिती बघितली तर स्वांतत्र्याचे पंच्चेहत्तर वर्षे पुर्ण होऊनही स्वातंत्र्य भारतात करोडो जनता उपासी राहते, भुकमरीने मरतात. याचाच अर्थ आजच स्वातंत्र्याचा सुर्य सर्वमाणसापर्यंत पोहचलाच नाही. स्वातंत्र्याची फळे सर्वसामान्य मानसाला चाखायला मिळायला उशीर लागेल किंबहुना मिळणारणच नाही याच दृष्टीने केलेले पंचेहत्तर वर्षाअगोदरचे अण्णा भाऊ साठे यांचे विधान जसास तसे आज लागु होते म्हणजे अण्णा भाऊ दूरदृष्टीकोन असणारे जागृत नागरीकही होते. हे आपणास विसरून चालणार नाही. आपल्या साहीत्याच्या जोरावर रशियामध्ये जाण्याची संधी मिळाली आणि रशियामध्ये जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाढा गाऊन आमचा देश किती पराक्रमी व नितीवान आहे हे जगाला सांगितले. अण्णाभाऊ यांना रशियामध्ये जाण्यासाठी दोनवेळा व्हिसा नाकरण्यात आला परंतु शासकीय समुहात त्यांची वर्णी लागल्याने त्यांना रशियाला जाण्याचे सप्न साकार करता आले याची सुद्धां आपल्याला माहिती असणे आवश्यक आहे. रशियामध्ये गेलेल्या टीम ने आपापल्या क्षेत्रातील घटकांची पाहणी केली परंतु अण्णाभाऊ साठे यांनी फुटपाथ ची पाहणी करून सर्व सामान्य लोकांची परिस्थिती जानून घेण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी कामगारांबद्दल असलेली आपुलकी व साहीत्य क्षेत्रातील योगदान आणि विशेष म्हणजे लोकप्रिय लेनिनग्राडचा पोवाढा यामुळे अण्णाभाऊ साठे यांच्या नावाची चर्चा संपूर्ण रशिया मध्ये होत होती. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची व कामाची दखल घेऊन रशियाच्या मॉस्को शहरात भव्य अशा पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. हा मराठी भाषिक लोकांचा गौरव तर आहेच पण संपूर्ण भारताचा गौरव आहे. हे विसरून चालणार नाही.




आपल्या पहाडी आवाजाने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ गावागावात व तरुणांच्या मनात रूजवण्याचे काम शाहीर अमर शेख व अण्णा भाऊ साठे यांनी केले. पोवाड्याच्या माध्यमातून डफाच्या जोरावर प्रबोधन करून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा आवाज मजबूत करून जनसमर्थन मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रबोधनाची मशाल पेटती ठेवली. म्हणून संयुक्त महाराष्ट्र चळवळीमधून अण्णा भाऊ साठे यांचे नाव वगळून चळवळ पुर्णपणे सांगताच येत नाही. अण्णा भाऊ साठे यांच्यावर वेगवेगळ्या विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. म्हणून जेथे जेथे कामगार, सर्वसामान्य लोकांवर अन्याय अत्याचार होईल तेथे अण्णा भाऊ साठे यांचे विचार व उपस्थिती दिसुन येते. अण्णा भाऊ साठे हे आंबेडकरवादी विचाराकडे आकर्षित झाल्याचे दिसतात. त्यांच्या साहित्यात शोषीत समुदायाबद्दल न्यायीक भूमिका आढळते. तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शोकसभेमध्ये 'जग बदल घालुनी घाव, सांगुन गेले मज भिमराव' असे मत मांडून सर्वसामान्य व शोषित लोकांच्या उत्थानासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिवाय पर्याय नाही असे मत व्यक्त करून अभिवादन ही केले. थोडक्यात अण्णा भाऊ साठे एक गुणवत्तेचे साहित्यिक तर होतेच परंतु संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या माध्यमातून सामाजिक कार्याची धुरा देखील त्यांनी सांभाळली. म्हणजे अण्णा भाऊ साठे हे बहुआयामी व्यक्तीमत्व असुन महाराष्ट्र आणि भारतात मात्र अण्णा भाऊ साठे यांना आजही उपेक्षित ठेवले गेले. केवळ जाती धर्मामुळे अण्णा भाऊचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. जर तसे नसते झाले तर किमान महाराष्ट्र भुषण देऊन तरी त्यांचा गौरव केला असता. परंतु जातीधर्माचे राजकारण करणारे लोक अण्णाभाऊ साठेचा देखील केवळ राजकीय वापर करून मतपेटी भरण्याचा केवीलवाणा प्रयोग करताना दिसत आहेत. केवळ महामंडळ यांना नाव देणे, काही ठिकाणी पुतळे बांधल्याने सन्मान होत नाही तर शासन दरबारी साहित्य क्षेत्रात अण्णा भाऊच्या नावाने पुरस्कार देणे, साहित्य क्षेत्रात एखादा उपक्रम राबवने, नागरी पुरस्कार देणे अशा बाबी केल्या तरच अण्णाभाउंचा खऱ्या अर्थाने सन्मान होईल परंतु कर्तृत्व असुनही केवळ जाती मुळे कर्तुत्व दाबण्याचा प्रयत्न करणे आपल्याला नवीन नाही. व्यवस्था किती मागे आणण्याचा प्रयत्न करेल परंतु वैचारिक लोकांनी अण्णाभाऊ साठे विषयी वैचारिक प्रबोधन करुन त्यांचे साहित्य व सामाजिक कार्य यावर प्रकाश टाकण्याचा सतत प्रयत्न करावा. हिच त्यांना आदरांजली ठरेल.

# कवी लबडे यांच्या काव्यातील जाणिवा : डॉ. प्रभुणे

आधुनिक केसरी

**कवी बाळासाहेब लबडे यांच्या 'मुंबई...बंबई....बॉम्बे....' या कवितासंग्रहावर मान्यवर समिक्षकांनी विविध दृष्टिकोन समोर ठेऊन सविस्तर लिहिले आहे. त्यांच्या कवितेचे वेगळेपण व विशिष्ट्य कशात दडले आहे याची सोदाहरण चर्चा मान्यवराच्या समीक्षालेखांमधून केली गेली आहे. इथे मात्र 'मुंबई...बंबई....बॉम्बे....' या एकाच कवितासंग्रहाचा विचार न करता त्यांच्या दोन्ही कवितासंग्रहांचा विचार केलेला आहे. तो करताना त्यांच्या कवितेतून प्रकट होणारी प्रधान जीवनजाणीव कोणत्या प्रतिमासृष्टीतून प्रकट होते यांचाही विचार केलेला आहे. आध्यात्मिक गाव, भाविकांच्या धार्मिक श्रद्धा आणि माणसाचा जिवंत राहण्यासाठी चाललेला जीवघेणा संघर्ष यातील विसंगती कविमनाला अस्वस्थ करते.**

***(मागील अंकावरून)***

'बुड्या मारणा-याची गोष्ट' या कवितेत ही जाणीव अशा शब्दात प्रकट होतेः **एक बुडी : मुक्तीच्या वाटवर दुसरी बुडी : अदैतानंदाची तिसरी बुडी : जगण्याची एक दिवास्वप्न छापा काटा : छापा काटा पैसेच पैसे : पैसेच पैसे उघड्या वागड्या अंगावर गाळाचा थवा; डुबक्यावर डुबक्या उत्साहात जळकी मळकी चार हाडे हातात; बुड्यावे बुड्या सात बुड्या जन्म मरणाच्या कोड्यातून सुटल्यात कुड्या चकचकीत अध्यात्माचं रान कुंड म्हणजे सोन्याची खाण सरसर पैसे मोजताना त्याची कुंडलिनी शक्ती जागृत होते मनात वाजत राहतात भुकेचे टाळ ...... (महाद्वार) किंवा 'चाराणे आठाणे रुपया' या कवितेतही हाच भूकसंघर्ष पुढील शब्दात अभिव्यक्त झाला आहेः ही इंद्रायणी वाहते आहे संथ आणि ते बसले आहेत; गळ टाकून तासनतास तेव्हा सिद्धबेट पाहत असते त्यांच्याकडे.... त्यांच्या तळहातावरच्या भाकरी खाण्याकडे; आणि कटेवर हात ठेवलेल्या विठ्ठलाकडेही; मळकट कपड्यांच्या म्हाता-या उतरतात पाण्यात; तेव्हा पाणी अधिकच सुंदर दिसू लागते हातात उपकरण घेऊन; त्या चाळतात वाळू नदीपात्रातली अन् शाबुत काढतात चार – आठाणे त्यातून शेवाळलेल्या अस्थिविसर्जनातूनही त्या मिळवत राहतात काही बाही तेव्हा त्यांच्या कानापाशी मुक्ताई .... ताटीचे अभंग म्हणत राहते कोणत्याही पुंडलिकाची; होत नाही हिम्मत पुन्हा वीट फेकण्यासाठी ! (महाद्वार)** पवित्र इंद्रायणीच्या साक्षीने, 'जो जे वांछील तो ते लाहो | प्राणिजात ||' असे पसायदान मागणा-या ज्ञानेश्वर माउलीच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या सिद्धबेटाच्या साक्षीने ही भूकपीडित म्हातारी माणसे जगण्यासाठी धडपडत असतात. दयाळू विठूही कसा शांतपणे विटेवर उभा राहून व कटीवर हात ठेऊन नुसता बघत असतो. या विसंगतीने अस्वस्थ झालेल्या कविमनाची जाणीव रसिकालाही अस्वस्थ करून जाते. लेखनाला काव्यात्म पातळी प्राप्त करून देते.

अशा भूकपीडित माणसांना बाजारू मूल्य देणारा निर्घृण समाज आहे. मुंबईतल्या वारांगना 'फोर्टमधल्या बायका', 'मुंबई सेन्ट्रलच्या चांदण्या' (मुंबई...बंबई.... बॉम्बे....) अशा कवितांमधून ही जाणीव व्यक्त झाली आहे. मुंबईतील गरीबीत राहणारी माणसे, झोपडपट्ट्यांत जगणारे जीव अशीच भुकेची जाणीव सूचित करणारे आहेत. लबडे यांच्या कवितेतून प्रकट होणा-या दारिद्र्यविषयक जीवनजाणिवेत जीवनसंघर्षाला स्थान आहे. दारिद्र्या विरोधात होणा-या विद्रोहाला नाही. या जाणिवा शब्दरूप घेतात त्या प्रतिमांतून. या प्रतिमांचे स्वरूप काय व कसे आहे ते आता बघू.

कवितांतील प्रतिमांचे अंतःस्वरूपः

लबडे यांच्या दोन्ही कविता संग्रहातील कविता या 'गावकविता' आहेत. आळंदी आणि मुंबई या दोन गर्दीच्या गावांचे व्यक्तिचित्र रेखाटणा-या या कविता आहेत. म्हणून 'गावांचे व्यक्तिचित्र' रेखाटणे, 'गावांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे दर्शन' घडवणे हे या दोन्ही कविता संग्रहांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. किंबहुना त्यासाठीच त्या जन्मल्या आहेत. असे असले तरी या कविता केवळ गाववर्णने करणा-या कविता नाहीत तर आळंदीच्या भक्तिमय आध्यात्मिक वातावरणात वाढलेल्या व त्यामुळे पारंपरिक सांस्कृतिक संकल्पनांचे भाषेवर, शब्दांवर संस्कार झालेल्या कवीने अशा शब्दप्रतिमांमधून अनुभव साकार केले आहेत. "आपले गाव.... आपला परिसर कोणत्याही कवीचे भावनिक अधिष्ठान असते. किंबहुना ती नाळ गावापासून दूर गेला तरी तुटत नाही. कारण कवीच्या भावविश्वाचा अतूट असा भावसंबंध असतो...." असे संग्रहाच्या प्रस्तावनेत संजय सोनवणी यांनी म्हटले आहे. त्याचा प्रत्यय दोन्ही संग्रहातील कवितांतील प्रतिमासृष्टीतून येतो. 'मुंबादेवी'चे वर्णन करताना ते लिहितात,

सहस्र बाहुंमध्ये आयुधे घेऊन तू असतेस महाअंबा
कृपेसाठी उत्पत्ती, विकास, लय तुझ्या तीन रूपांनी
बदलतात माणसांच्या जगण्याचे ऋतू
फाटक्या चादरीतले जीव अमर्यादित स्वप्नांचे इच्छाळ
दगड गर्दीच्या फलाटांवर तुझी आरती
प्रसाद इथल्या भोगवादी गल्ल्यांमधून
अनेक अंगांनी, अनेक रंगांनी
होणारा गोंधळ अन् हातातोंडाच्या संबळी
धुपारत्या, शेजारत्या, झोपड्यांच्या
श्रमिकांच्या घामाळ माळा गळ्यात ('मुंबई...बंबई.... बॉम्बे....' मुंबादेवी पृ. २)

मुंबादेवीचे व्यक्तिचित्र रेखाटणाऱ्या या पहिल्याच कवितेत मुंबईचे ग्रामदैवत असणाऱ्या मुंबादेवीचा संदर्भ असणारी ही कविता अनुक्रमाने आहे. हे अर्थपूर्ण आहे. सहस्र बाहुंमध्ये आयुधे घेऊन ही महाअंबा कृपेसाठी जणू उत्सुक आहे. सर्वांचे कल्याण करणारी आहे. 'अस्तित्वहीन, भणंग, रंजले, विस्थापित' या मुंबादेवीच्या 'नजरेच्या कटाक्षाने रात्रीत उजळतात.' आणि 'उडायला लागतात हवेवर. तुझ्या कृपेचा लाल मळवट प्रत्येकाच्या कपाळी' लागू शकतो. अशा रूपकाने मुंबईच्या व्यक्तिचित्राची साधली जाते. अर्थातच अनुरूप ठरतील अशा प्रतिमांतून हे रूपक साकार केले जाते. उदाहरणार्थ, 'महाअंबेची कृपा', 'होणारा गोंधळ', 'हातातोंडाच्या संबळी', 'घामाळ माळा गळ्यात' अशा प्रतिमांतून हे रूपक साकार केले जाते. या प्रतिमांचे औचित्य अर्थपूर्ण असले तरी त्यांचा जन्म कवीच्या आळंदीतील भावजीवनातून झाला आहे. भक्तिमय भवतालाने संस्कारित झालेले मन अशा अनेक काव्यप्रतिमांमधून प्रकट होत असलेले दिसते. 'कन्हुनी मलूल यंत्रे' कवितेतही अशाच आध्यात्मिक जीवनाशी संबंधित प्रतिमांतून अनुभव साकार केला गेला आहेः उसासारखी सोलली, स्वतःच आपली त्वचा निष्ठुर भाकरी पाठी, गायल्या कष्टाच्या ऋचा डोळ्यांत अवेळी रित्या, धावले पांढरे ससे चेकाळले प्लॅटफॉर्म, पांघरून ही माणसे हसे जंजाळ मेंदूचे, दिवसाच्या भात्यामध्ये फुलली घामाची फुले, ही तुकाची गाथा वदे यंत्रांच्या निष्ठुर जत्रा, बिनधास्त माणसांच्या हरवल्या कोऱ्या मात्रा, कोंडुनी सा-याच वाचा भजनात गुंगली ही, कन्हुनी मलूल यंत्रे कोरड्या ओठांनी रोज, भुकेने गातात मंत्रे ('मुंबई... बंबई....बॉम्बे.... पृ. ) लबडे यांची ही एक महत्त्वाची कविता आहे. मुंबई महानगराचे आणि मुंबईतील यंत्रांचे, यंत्रांवर काम करणा-या राबणा-या मजुरांचे हे नुसते पद्यमय वर्णन नाही. खेड्यातील पारंपरिक भारतीय कृषिसंकृतीत वाढलेल्या, ग्रामीण भागात शांत जीवन जगणा-या, ग्रामदेवाच्या देवळातील कीर्तनात रात्र जागवणाऱ्या, ज्ञानदेव-तुक्याच्या भजनात रमणाऱ्या, वार्षिक जत्रांचा आकंठ आनंद उपभोगणा-या माणसांना त्यांची काळी आई सोडून, गाव-शीव सोडून, घरदार सोडून, पोट भरण्यासाठी मुंबादेवीला शरण जावे लागले. तिचे आश्रित व्हावे लागले. नवी यंत्राधिष्ठित संस्कृती स्वीकारावी लागली. यंत्रांच्या सहवासात यंत्रमय कष्टदायक जीवन स्वीकारणे भाग पडले. निष्ठुर भाकरीपोटी जीवघेणे कष्ट करताना स्वतःच आपली त्वचा उसासारखी सोलून काढावी लागली. मन प्रसन्न करणारी, कष्ट हलके करणारी मोटेवरची, शेतावर कष्ट करतानाची गीते गावाकडेच सोडून यावी लागली आणि कष्टाच्या ऋचा जीवनाचा धर्म बनल्या. यंत्रांच्या जत्रा त्यांच्या रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या. यंत्रजत्रांच्या कर्णकटू गोंगाट हीच जणू तुकयाची गाथा बनली आणि घामाची फुलेच या यंत्रशेतीत फुलू शकली. ग्रामदेवतेच्या देवळात काया-वाचा-मने भजणारी, भजनाला, नामस्मरणाला वाचा वाहणारी या माणसांची वाचाच जणू या कर्णकटू यंत्रगोंगाटाने हिरावून घेतली. त्या गोंगाटात कोंडून पडली. यंत्रगोंगाट हेच भजन बनले. तेच तेच यांत्रिक कष्ट करून आनंद हरवलेले हे जीव शुष्कओष्ठ निष्प्राण बनले. यंत्रांवर अपरिमित कष्ट करून देहवेदनांनी कण्हणारे हे ग्रामजीव मलूल बनले. स्वतःच एक मलूल यंत्र बनले. यंत्रांच्या कर्णकटू गोंगाटात या मलूल जीवांचा कण्हण्याचा क्षीण स्वर मिसळून लुप्त झाला. हे बुभुक्षित आत्मे तरीही यंत्रदेवतेला त्यांच्या शुष्क ओठांतून बाहेर पडणा-या कण्हण्याच्या मंत्रांनी रोजची भूक भागवण्यासाठी रोज आळवतात. ही कविता त्यांच्या प्रतिमासृष्टीच्या स्वरूपावर प्रकाश टाकणारी आहे. आळंदीच्या आध्यात्मिक वातारणात वाढल्याने त्यांच्या अनेक कवितांतील अनुभव साक्षात होत असताना 'ऋचा', 'तुकाची गाथा', (कन्हुनी मलूल यंत्रे) 'महाअंबा', 'प्रसाद', 'संबळी', 'लाल मळवट', 'मांगल्याचे स्तोत्र', 'धुपारत्या', 'शेजारत्या' (मुंबादेवी) 'ओंकाराकडे', (एलिफंटा केव्ह्ज) 'शिवो अहम्' (म्हणतात हे शहर फारच व्यावसायिक आहे) 'दीपमाळा', 'सूर्यप्रभेच्या चांदण्या', 'सत्य, शिव, सुंदरता' (फोर्टमधल्या बायका) 'सिमेंटी सडे', 'चंद्रभागे आंघोळीस', 'टाळ, मृदुंग' (झोपड्यांच्या लाख शिव्या) 'जलाभिषेक' (काश्मीर'लेक' पार्ले) अशा अनेकानेक भारतीय पारंपरिक संस्कृतीतून जन्मलेल्या प्रतिमांतून अनुभवाला अर्थपूर्णता प्राप्त करून दिली जात असलेली दिसते. मुंबई, मुंबईचे यांत्रिक जीवन, बकाल जीवन, समृद्ध जीवन या सर्वांना साकार करण्यासाठी रूढ प्रचलित अभिधायुक्त शब्द योजनेपेक्षा लबडे अनेक कवितांमधून भारतीय पारंपरिक संस्कृतीतून जन्मलेल्या प्रतिमांचे उपयोजन करतात हे लक्षणीय आहे. यामुळे अशा कविता अर्थसमृद्ध बनल्या.




'सिमेंटी सडे' 'टाळ मृदुंग बनुनी, वाजती खाटिकखाने' (झोपड्यांच्या लाख शिव्या) या सारख्या प्रतिमांच्या उपयोजनेतून विरोधी न्यास साधण्यात लबडे यशस्वी झाले आहेत. मुंबईत पोटासाठी येणा-या खेड्यातील माणसाला झोपडपट्टीत राहणे भाग पडू लागले. 'टाळ मृदुंगाच्या तालबद्ध, सात्त्विक, श्रवणीय तालावर डोलणा-या भाविकाला पशुहत्त्या करताना होणारा तालबद्धच पण तामसी, अश्रवणीय आवाज ऐकण्याची पाळी आली. यात एक विसंगती आहे. अर्थाचा एक विरोधी न्यास आहे. त्यात सूचक अर्थवलये निर्माण करण्याची क्षमता आहे. म्हणून काव्यात्मता आहे. लबडे यांची कविता ही अशी परिसराला, गावाला, गावातल्या जीवनव्यवहाराला शब्दबद्ध करणारी आहे. हा तिचा परिप्रेक्ष आहे.



# देवपूर परिसरात गावठी कट्टा बाळगणारा एलसीबीच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** हेमंत पाटील नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा धुळे यांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, देवपूर पोलीस ठाणे हद्दीत इसम नामे त्रिशुल रमेश सूर्यवंशी वय-३२ रा. शारदा नगर मधुबन बंगल्या समोर, देवपूर धुळे हा देशी बनावटीचा गावठी कटटा सोबत बाळगत असुन तो धुळे शहरातील देवपूर भागात हिम हॉटेल च्या बाजुला जाणाऱ्या रस्त्यावर संशयित रित्या उभा आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांचे आदेशावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे मच्छिंद्र साहेबराव पाटील, रविकिरण गणपत राठोड, निलेश कालीदास पोतदार, सुशिल पकाश शेंड, सागर सुभाष शिर्के, गुणवंत अशोकराव पाटील अशांनी छापा टाकुन कारवाई करता छापा कारवाईत ४०,००० किं.चा एक गावठी बनावटीचे पिस्तुल (गावठी कट्टा) स्टील बॉडी असलेला. त्याचे ग्रीपवर दोन्ही बाजूस स्कूने घट्ट बसविलेला लाल रंगाचा प्लॉटीक पटटी.

१००० /-गावटी बनावटी पिस्टल चा जिवंत राऊंड जु.वा.कि.अ. एकूण ४१,०००हजाराचा मुद्दे मला जप्त करण्यात आला आहे .त्रिशुल रमेश सुर्यवंशी याचे विरुध्द पोको गुणवंत अशोकराव पाटील नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा धुळे यांचे तक्रारीवरून देवपूर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार अधिनियम सन १९५९ चे कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येत आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास देवपुर पोलीस करीत आहेत. सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक, धुळे व किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, मच्छिंद्र साहेबराव पाटील, रविकिरण गणपत राठोड, निलेश कालीदास पोतदार, सुशिल पकाश शेंड,सागर सुभाष शिर्के, गुणवंत अशोकराव पाटील अशांनी केली आहे.

# वंचित बहुजन आघाडीचे लाक्षणिक आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगांव जामोद :** ३१ जुलै २०२३रोजी जळगाव जामोद तहसील कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडी तालुका व शहर आघाडीच्या वतीने एक दिवशीय लाक्षणिक अर्ध नग्न आंदोलन करण्यात आले संपूर्ण जळगाव शहर व जळगाव जामोद तालुका पाण्याखाली आला होता. या महापुराच्या पाण्याने अनेक कुटुंब ही बेघर झाली तसेच शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन खरडून गेली ही सर्व परिस्थिती झाल्यानंतर प्रशासनाकडून आज पर्यंत बऱ्याच ठिकाणी शेतीचे पंचनामे घराचे पंचनामे आज पर्यंत झाले नाही आणि अनेक कुटुंब हे अतिक्रमण करून नदी नाल्याकाठी राहतात त्याचप्रमाणे अनेक भूमी नागरिकांनी अतिक्रमण जमिनी अनेक वर्षापासून वहित करून त्यावर आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते त्यांचे सुद्धा पंचनामे आज पर्यंत झाले नाही त्यांनाही आर्थिक मदत देण्यात यावी आम्ही या आंदोलनाच्या माध्यमातून पुढील मागण्या या प्रशासनाला केले आहे १ )शेतकऱ्यांना एक लाख रुपये मदत देण्यात यावी २ )विना रेशन कार्ड धारकाला अन्नधान्य देण्यात यावे ( ३ )बेघर कुटुंबांना तात्काळ घरकुल मंजूर करण्यात यावे ( ४ )नदीकाठी अतिक्रमन धारकांना कायमस्वरूपी पुनर्वसित करावे अशा विविध मागण्या आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनाला करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे वतीने तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले या निवेदनावर जिल्हा संघटक अरुण भाऊ पारवे शहराध्यक्ष आजम कुरेशी माजी तालुकाध्यक्ष रतन नाईक तालुका महासचिव विजय सातव तालुका उपाध्यक्ष सुनील बोदडे,तालुका उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे महिला आघाडीच्या पार्वताबाई इंगळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत अवसरमोल ,युवा नेते प्रकाश भिसे , जगदीश हातेकर, मुजीब खान कदिर मौलाना मंगला विजय पारवे विजय तायडे सुधाकर घटे मनोज अंदुरकार, श्रीकृष्ण गवई भास्कर भगत कैलास भगत सुषमा हिवाळे निलेश वानखडे संतोष पवार अमोल तायडे यांच्या सह्या आहेत शेकडो कार्यकर्त्यांसह पूरग्रस्त नागरिक हजर होते या आंदोलनाला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते प्रसेनजित पाटील आणि कम्युनिस्ट पक्षाचे नेते विजय पोहणकर, रामेश्वर काळे यांनी पांठिबा दिला.



# महाज्योतीच्या परीक्षा पुन्हा घ्या : अतुल लोंढे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाज्योती, सारथी, बार्टी या संस्था गरिब कुटुंबातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देऊन मोठ्या प्रशासकीय पदावर जाता यावे म्हणून शासनाने सुरु केल्या आहेत. पण महाज्योतीच्या नुकतीच पार पडलेल्या परीक्षेत गडबड घोटाळा झाला आहे. या परिक्षेतील भ्रष्टाचार मोडून काढून परीक्षा पुन्हा घ्यावी व विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अन्यथा मोठे आंदोलन केले जाईल, असा इशारा प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिला आहे.

यासंदर्भात बोलताना कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले की, महाज्योतीच्या परिक्षेचा पेपर हा पुण्यातील एक खासगी संस्थेने टेस्ट सिरिज घेतली तोच होता, त्याच संस्थेच्या पेपरमधील प्रश्न महाज्योतीच्या पेपरमध्ये होते. अशा परिस्थितीत त्या संस्थेतील मुलांनाच प्रवेश मिळणार हे उघड आहे. मग गडचिरोली, यवतमाळ, किनवट, नंदुरबार, धुळे, जळगावसह राज्यातील इतर भागातील मुलांना प्रवेश कसा मिळणार ? या भागातील मुलांनी काय करायचे ? किंवा ज्या विद्यार्थ्यांनी त्या खासगी संस्थेचा क्लास केला नाही त्यांनी काय करायचे ? हा प्रश्न आहे. प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगलेल्या सामान्य कुटुंबातील मुलांवर हा मोठा अन्याय आहे. सरकारने या प्रकरणी लक्ष घालून महाज्योतीच्या परीक्षेत झालेला घोटाळा शोधून काढावा तसेच फेरपरीक्षा घेऊन मुलांना न्याय द्यावा अशी मागणी अतुल लोंढे यांनी केली आहे.

# शिवाजी विद्यालयात अण्णाभाऊ साठे, टिळकांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी विद्यालयात व उच्च माध्यमिक कै.लक्ष्मणराव भिमराव कोलते पाटील इंग्रजी प्रार्थमिक विद्यालयात दि.१/८/२३ मंगळवार रोजी लोकशहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंची १०३ वी जयंती तथा बाळ गंगाधर टिळक यांची १०३ वी पुण्यतिथी निमित्त दोघा थोर विभुतींना विनम्र अभिवादन करून विविध कार्यक्रम घेण्यात आले. यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यत प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील व सचिव रत्नाताई कोलते पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले करण्यात आले. शिवाजी विद्यालयात या शाळेत या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते व मुख्याध्यापक पंजाबराव शेळके यांनी केले प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील व विद्याथ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या दोन्ही कतृत्ववान थोर दिवंगत विभुतींच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित शिक्षकवृंदच्या हस्ते करण्यात येऊन त्यांना अभिवादन करण्यात आले. प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या "पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून, कष्टकरांच्या व श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे" या वचनाचा हवाला देत उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना कष्टाची जाणीव करुन दिली, लोकमान्य टिळकांबद्दलही सुंदर असे मत त्यांनी मनोगतातून व्यक्त केले.प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनीही विद्यार्थ्यांना या दोन्हीही थोर व्यक्तीमत्वांकडून आपणास खुप काही शिकायला मिळत असल्याचे सांगून आपल्या भावना व्यक्त केल्या.सदर कार्यक्रमात या थोर व्यक्तींच्या जीवनपटावर आधारित वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली,प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.मदनभाऊ डोंखळे यांनी केले तर आभार प्रा.पंजाबराव शेळके यांनी मानले, सदर कार्यक्रम यशस्वी होणेसाठी महाविद्यालयाच्या शिक्षक-शिक्षिका-शिक्षकेतर बंधु-भगिनींनी मोलाचे सहकार्य केले. या सर्व मुद्याचे घटनेने कसे मिळाले संरक्षण घटनेने आहे.त्याची महीती व उदाहरणे देऊन कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भास्कर ससाणे, श्रीकृष्ण सोनुने, सुदाम राठोड, मुकुंदा व्यवहारे, संजय जोशी, सुदाम जाधव, पोपटराव सोनवणे, अजबराव चव्हाण,शाम जाधव, अमोल गवयी, बाबासाहेब कोलते, विकास सुरडकर,शिक्षक, शिक्षकतेर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# साठे जयंतीनिमित्त वाचनालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शहरात साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच शहरातून सायंकाळी ४वाजेनन्तर जयंतीची मिरवणुक मोठया उत्साहात काढण्यात आली. यासोबतच खुलताबाद येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या समाज सभागृहामध्ये सार्वजनिक वाचनालयाचे देखील उद्घाटन करण्यात आले. या वाचनालयाला खुलताबाद नगरपरिषदेकडून वाचनालयाकरिता पुस्तके व टेबल खुर्च्यासह इतर साहित्य देण्यात आले. याप्रसंगी नप मुख्याधिकारी विक्रम दराडे. माजी नगराध्यक्ष एस एम कमर. प्रकाश वाकळे , दिनेश सावजी परसराम बारगळ, दिनेश अंभोरे, सतीश दांडेकर, अशोक तुपे काशिनाथ तुपे, गणेश आधाने, ज्ञानेश्वर बारगळ, मोहन तुपे मच्छिंद्र घोरपडे, शंकर अंभोरे, जावेद शेख यांच्यासह समाज बांधव व शहरातील असंख्य नागरिक उपस्थित होते.



# मुख्याध्यापक टी. एस. बिरादार यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**जत /सांगली :** सोन्याळ ता. जत येथिल विजय विठ्ठल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक टी. एस. बिरादार यांचा सोन्याळ हायस्कूल मध्ये सेवा काल संपल्याचे औचित्य साधून सोन्याळचे लोकनियुक्त सरपंच बसवराज तेली यांच्यावतीने निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सोन्याळ ग्रामपंचायत व गावकऱ्यांच्या वतीने मुख्याध्यापक बिरादार यांना निरोप देण्यात आला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून माजी शिक्षण व आरोग्य सभापती श्री तम्मणगौडा रवीपाटील उपस्थित होते. टी. एस. बिरादार यांनी सोन्याळ हायस्कूल मध्ये १९ वर्षे शिक्षक म्हणून व १४ वर्षे मुख्याध्यापक म्हणून असे एकूण ३३ वर्षे सेवा बजावली. त्यानी आपल्या कार्यकाळात शाळा व संस्थेसाठी भरीव योगदान दिले. लोकनियुक्त सरपंच बसवराज तेली व माजी सभापती तम्मणगौडा रवीपाचील यांच्याकडून त्यांचा सत्कार करण्यात आला त्याचबरोबर शाळेमधील २०२२-२०२३ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. निरोप समारंभ प्रसंगी सरपंच बसवराज तेली, तम्मणगौडा रवीपाटील, जाडरबोबलादचे सरपंच रामनिंग निवरगी, सोन्याळचे उपसरपंच वतन गारळे, ग्रामपंचायत सदस्य लक्कव्वा पुजारी, धानव्वा शिंगे, नितीन शिंदे, रफिक नदाफ, विजयकुमार बगली व अन्य मान्यवर उपस्थित होते.





# लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कामगारांना पेट्या वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची 103 वी जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त बांधकाम कामगारांना कामगार पेटी किट वाटप करण्यात आले.

वाडोद बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे, ग्रामपंचायत सदस्य शेख राजीक, अध्यक्ष रमेश धनके, गोविंद पांडेजी, अशोक शिंगारे अरुण वायकोस, संतोष शिंगारे, काशिनाथ वाघ, पंढरीनाथ वाघ, ताज्या मत शहा, साबेर पठाण, शुभम गंगावणे, पत्रकार काळू म्हस्के, राजू मस्के दादाराव काळे राजू पांढरे राजू घावरी, रमेश डीडोरे, शेख मंजुर, प्रकाश बीलघे, सुभाष दाभ्रे शेख फाई म, शेख अहमद, कडूबा हिवराळे विशाल दणके, लखन दणके, गणेश कांबळे, अमोल दणके, आनंद दणके, बाळू तोरणमाळ, पुंडलिक दणके, कृष्णा स हाणे, शिवजी काटकर, मधुकर म्हस्के, गणेश दणके, वृशभ दणके, शेख वसीम आदींसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना पौष्टीक तृणधान्याविषयी मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील अंजोळा येथे तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया ,मंडळ कृषी अधिकारी संपत वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष अंतर्गत तालुक्यात गावागावात 1 ऑगस्ट ते 14 ऑगस्ट पर्यंत विद्यार्थी पौष्टिक आहार व राजगिरा पीक जागरूकता मोहीम राबवण्यात येत आहे त्याचेच औचित्य साधून अंजोळा/ वाकडी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व व तृणधान्य ही काळाची गरज ओळखून तृणधान्य पिकांचा पेरा वाढवण्यासंदर्भात कृषी पर्यवेक्षक दीपक बिरारे यांनी सविस्तर असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना तृणधान्य आहारात वापर व जनजागृतीसाठी शपथ दिली. तसेच राजगिरा पिकाचे महत्त्व व उत्पादित झालेल्या राजगिरा पिकाचे सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगातून होणारा फायदा याविषयी कृषी सहाय्यक सतीश बोरसे यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमास कृषि पर्यवेक्षक प्रदीप पाटील तसेच गावाचे सरपंच ,शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निश्चितच चांगले काम करण्याचा प्रयत्न करू : सपोनि सुशील भोसले

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जे सहकार्य वायकर साहेबांना केलेले आहे. तेच सहकार्य मला देखील करावे. ही मी तुमच्याकडून आशा बाळगतो. वायकर साहेबांनी ज्या प्रमाणे कार्य केले. त्याप्रमाणे निश्चितच त्यापेक्षा ही चांगलं काम करण्याचा प्रयत्न करू. यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता भासेलच.

येणाऱ्या कालावधीमध्ये आपल्याकडुन छोटे छोटे उपक्रम राबविण्यात येतील. त्याच्या ध्ये सुद्धा आपण सहभाग नोंदवावा, असे लोणंद पोलीस ठाण्याचे नूतन प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक सुशिल भोसले यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले. लोणंद, ता.खंडाळा येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांचा निरोप समारंभ व नूतन प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले यांचा स्वागत समारंभ या दोन्ही कार्यक्रमाचे आयोजन लोणंद पोलीस ठाणे आणि पोलीस पाटील ग्रुप व नागरिक यांच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी सपोनि सुशिल भोसले बोलत असताना विचारपिठावर सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर,पोलीस उपनिरीक्षक गणेश माने,प्रियांका वायकर आदी उपस्थित होते.सपोनि विशाल वायकर यांनी केलेल्या कामकाजा बाबत समाधान व्यक्त करताना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे विशेष कौतूक केले.लोणंद पोलिस ठाण्याच्या हद्दीत अनेक अवघड गुन्हे घडले होते.हे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सपोनि विशाल वायकर यांनी यशस्वीपणे असे प्रयत्न केले होते.त्यांना निरोप देत असताना त्यांच्या कार्याबद्दल त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव झाला.तसेच काही दिवसांपूर्वी लोणंद पोलीस ठाण्यातून बदली होऊन गेलेले पोलिस उपनिरीक्षक गणेश माने व स्वाती पवार यांचाही ही सत्कार करण्यात आला.पोलिस उपनिरीक्षक गणेश माने, सर्फराज बागवान, डॉ.नितीन सावंत, राजेंद्र डोईफोडे, राहुल घाडगे, सूनिल शेळके, शैलजा खरात, स्मिता खरात, शशिकांत जाधव, भरत शेळके, सागर शेळके, बिपीन मोहिते, अमोल गायकवाड आदींसह इतरांनी मनोगते व्यक्त करत सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांच्या कार्याचे कौतुक केले. जिल्हा परिषदेचे सदस्य दत्ता अनपट,नगरसेवक रविंद्र क्षीरसागर, सुभाष घाडगे आदींनी कार्यक्रमापूर्वी भेट घेत सत्कार केला.

नगराध्यक्ष मधुमती गालिंदे, उपनगराध्यक्ष शिवाजीराव शेळके, माजी नगराध्यक्ष सचिन शेळके, नगरसेवक भरत बोडरे, गणी कच्छी, संदीप शेळके, गिरीश रावळ, भावेश दोशी, शंभुराज भोसले यांच्या सह इतरांनी ही शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन करताना नंदकुमार खताळ, श्रीनाथ कदम, अतुल कुंभार,अविनाश नलवडे, अभिजित घनवट, सतीश दडस आदींसह इतरांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस हवालदार संजय बनकर,

प्रास्ताविक बीबीचे पोलीस पाटील अजित बोबडे यांनी केले तर आभार पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम यांनी मानले.



**चांगलं काम करण्याचा निश्चित प्रयत्न केला : सपोनि विशाल वायकर**

सत्कार समारंभ,निरोप समारंभ हा खरच एक भावनिक आहे .निश्चितच मनात राहणार आहे .
विशेष करून सांगायचं म्हटलं तर राजकीय व्यक्तिमत्व जर पाहिली, कधीही लोणंद मधील
एखादी गोष्ट आहे .ज्या गोष्टीकडे आपल्याला प्रकर्षाने लक्ष देणे गरजेचे आहे .तिथं राजकीय हेतू बाजूला ठेवून सर्वांनी एक सामाजिक जो काय सलोखा आहे किंवा कुठेही वातावरण खराब होणार नाही .असा विषय ही लोकं कायम माझ्या समोर घेऊन आली .त्या विषयाला अनुसरून चांगलं काम करण्याचा निश्चित प्रयत्न केला . असे सपोनि विशाल वायकर यांनी म्हटले .

# सर्व शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील ई-पीक पाहणी १०० टक्के पूर्ण करा : तहसीलदार

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी चालू खरीप हंगामातील ई-पीक पाहणी १०० टक्के पुर्ण करुन घेणे आवश्यक आहे असे आवाहन सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी केले आहे. सोयगाव तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी मोबाईल ॲपच्या सहाय्याने तलाठ्याकडे न जाता स्वतःच्या मोबाईलवरून आपल्या ७/१२ वर विविध पिकांची नोंदणी करता येणे शक्य झाले आहे.सोयगाव महसूल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प १५ ऑगस्ट २०२१ पासून राज्यभर राबविण्यात येत आहे. या ई-पीक पाहणी ॲपच्या माध्यमातून मागील वर्षी हंगामामध्ये सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी १०० टक्के ई-पीक पाहणी करुन आपल्या पीकाची नोंदणी करून शासनाच्या विविधि योजनांचा लाभ घेतला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सुरु असलेल्या खरीप हंगामाची ई-पीक पाहणी देखील आपल्याला यंदा पूर्ण १०० टक्के पुर्ण करावयाची आहे.

खरीप हंगाम २०२३ पीक पाहणी नोंदणीसाठी ई - पीक पाहणीचे २.०.११ हे अपडेटेड व्हर्जन गूगल प्ले स्टोअर वर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तरी सर्व खातेदार शेतकऱ्यांनी नवीन व्हर्जन अपडेट करून घेणे आवश्यक आहे. खरीप हंगामाच्या प्रत्यक्ष ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी करण्यासाठी ०१ जुलै २०२३ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

औरंगाबाद जिल्हयातील सर्व शेतकरी बंधु-भगिनीं, गावातील सरपंच, पोलीस पाटील, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, कोतवाल, स्वस्त धान्य दुकानदार, महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष, बचत गट प्रतिनिधी, सहकारी संस्थाचे अध्यक्ष व सचिव, अध्यक्ष- शेतकरी दुध उत्पादक संघ, पाणी फाउंडेशन गट, पोकरा प्रतिनिधी, ग्रामरोजगार सेवक, तांत्रीक सहाय्यक, बँक प्रतिनिधी, शाळा व कॉलज विद्यार्थी, प्रगतशिल शेतकरी, सर्व ग्रामपंचायत समिती, पंचायत समिती व जिल्हा परिषदचे सदस्य, मिडिया प्रतिनिधी, आपले सरकार सेवा केंद्र चालक यांनी देखील शासनाच्या महत्त्वाकांक्षी असलेल्या ई-पीक पाहणी प्रकल्पात सहभाग घेवून शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करण्यासाठी प्रोत्साहीत करावे असे हि तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी केले आहे. तरी सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकरी बंधु-भगिनींना अवाहन करण्यात येते कि त्यांनी खरीप हंगामा २०२३ साठी दिलेल्या कालावधीमध्ये आपली ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी जेणे करून शासनाच्या विविध योजना, पिक विमा, पिक कर्म. शासकीय अनुदान ई. विविध योजनांचा लाभ घेण्यास मदत होणार आहे. आपले संबंधित तालुकानिहाय हेल्पडेस्कच्या माध्यमातून सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत ई-पिक पाहणी करतांना शंका व अडचणी आल्यास सोयगाव कृषी विभागाशी व तहशिल कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन तहसीलदार मोहनलाल हरणे सोयगाव यांनी केले आहे.

|| नमो ||
शुभ कार्य तुमचे व्यवस्था आमची


विनोद मंडप डेकोरेटर्स अँड केटरर्स
लग्न, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, वास्तूशांती, शुभ कार्याच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.
प्रो.प्रा. विनोद जोगदंडे
9158500727, 8446185722
टाऊन हॉल, व्हीआयपी रोड, छत्रपती संभाजीगर

# जिंतूर तालुक्याचे अनुदान तत्काळ वाटप करा : मा.आ.विजय भांबळे

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील अतिवृष्टी व सततच्या पावसाचे परत गेलेले अनुदान तात्काळ वाटप करण्यात यावे, या मागणीच निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, जिंतूर च्या वतीने आर.के.गावडे जिल्हाधिकारी, परभणी यांना देण्यात आले.

जिंतूर तालुक्यात मागील वर्षी सन २०२२ मध्ये अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, त्यामुळे जिंतूर तालुक्यासाठी १५ कोटी ६ लाख रु अनुदान मंजूर केले होते. सदर अनुदान वाटपासाठी तलाठी मार्फत बँक खाते व आधार ई माहिती गोळा करणे प्रगतीपथावर असताना अचानक सदर अनुदान शासनाणे ईतर तालुक्यांसाठी वर्ग करण्यात आले आहे असे निदर्शनास आल्याची चर्चा होत आहे. त्यामुळे जिंतूर तालुक्यातील सर्व अतिवृष्टी बाधित शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत. शेतकरी यांनी अनुदाना बाबत विचारणा केली असता प्रशासनाच्या विविध पत्रान्वये अनेक संभ्रम निर्माण होत आहेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

तसेच गेल्या वर्षी अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे होणाऱ्या नुकसानभरपाई हि प्रति हेक्टरी १३,८००/- रु प्रमाणे देण्याच्या बाबत शासन निर्णय होता, परंतु, गेल्या वर्षी झालेल्या नुकसानाचे या वर्षी शासन प्रति हेक्टरी ६,८०० /- रु प्रमाणे देत आहे. तसेच जिंतूर तालुक्यात अतिवृष्टीने व सततच्या पावसाने सरसकट १००% नुकसान झालेले असताना शासन काही मंडळातील मोजक्याच गावामध्ये अनुदान देत आहे त्यासाठी सरसकट नुकसान असल्याने सर्वांना अनुदान देण्यात यावेत. गेल्या वर्षी जिंतूर तालुक्यात अतिवृष्टी झाली होती, त्यामुळे संपूर्ण नद्यांना पूर येऊन पुराचे पाणी शेतात जाऊन उगवलेली पिके वाहून गेली होती, तसेच शेतातील गाळ वाहून गेल्यामुळे खड्डूनी झाली होती, तसेच पुराच्या पाण्यामुळे विहिरी पडल्या होती, विहिरीतील वीजपंप व इतर साहित्य गाळात दबून प्रंचड नुकसान झाले होते, अनेक जनावरे दगावली होती,तसेच अनेक नागरिकांची घरे पडली होती, अशा प्रकारचे आसमानी संकट शेतकऱ्यांवर कोसळले होते. तसेच खरीपातील पिके सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, हळद, ऊस व फळबाग ई. पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले होते, अत्यंत महागामोलाचे बी-बियाणे, खते व इतर खर्च करून शेतातील पिके वाहून गेल्याने शेतकरी आर्थिक आडचनीत सापडला आहे. हि अतिवृष्टी व सततचा पाऊस प्रत्येक महसूल मंडळामध्ये झालेली होता. त्यामुळे त्यांच्या समोर दुबार पेरणी व काळात उपासमारिचा गंभीर प्रश्न उभा राहिला होता. त्यासाठी शेतकऱ्यांना बळ देण्यासाठी त्यांच्या बांधावर जाऊन पिकपंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शेतकऱ्यांनी मागणी केली होती. त्यांच्या मागणीचा व नुकसानीचा विचार करता शासनाने अनुदान मंजूर केले आहे. जेणेकरून या वर्षी शेतकऱ्यास खते व बि-बियाणे घेण्यासाठी आर्थिक मदत होईल.

परंतु, सदर अनुदान शासनाच्या कार्यालयीन फेऱ्यात अडकल्याने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या आशा मावळल्या आहेत. त्यासाठी आपण स्वतः लक्ष घालून जिंतूर तालुक्यातील सन २०२२ मधील अतिवृष्टी व सततच्या पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई व प्रति हेक्टरी १३,८००/- रु प्रमाणे अनुदान येत्या १५ दिवसाच्या आत वाटप करण्यात यावे. अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जिंतूर च्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, अशा ईशारा देखील या निवेदनात देण्यात आला.

यावेळी मा.आ.विजयराव भांबळे साहेब, प्रसादराव बुधवंत, अजय चौधरी, रामराव उबाळे, विश्वनाथ राठोड, मुरलीधर मते, अभिनय राऊत, विठ्ठल घोगरे, गणेशराव इलग, मनोज राऊत, खयुम कादरी, शंकर जाधव, पंडित जाधव, किशन मानवते, शंकर माने ई. उपस्थित होते.

# महात्मा फुलेंबद्दल अपशब्द बोलणाऱ्या संभाजी भिडेवर तत्काळ गुन्हे दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** थोर समाज सुधारक क्रांती सूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या बद्दल



संभाजी भिडे उर्फ मनोहर कुलकर्णी यांनी महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक, महिला शैक्षणिक क्रांती प्रनेते व ज्यांना क्रांती सूर्य संभोधले जाते त्यांच्या बद्दल अश्लाध्य भाषेत अवमान केला त्यांचे व्याख्यान दरम्यान त्यांनी वापरलेली बदनामी कारक शब्दे..... देशात इग्रजांनी ज्या गांडूना समाज सुधारांकांच्या पदव्या बहाल केल्या, फुले हि त्या समाज सुधारक नावाच्या भडव्याच्याचं यादीतले असल्या चे प्रतीपादन मनोहर कुलकर्णी ( संभाजी भिडे ) यांनी त्यांच्या अमरावती येथील सभेत केले. हे घृनास्पद वक्तव्य करून महात्मा ज्योतीराव फुले यांचा अवमान केला तसेच या पूर्वी हि थोर पुरुषाचां वारंवार ते अपमान करत आहेत, फुले दामपत्य सह इतर हि समाज सुधारक यांचा ते आपल्या विषेल्या वाणीतून सतत गरळ ओकत आहे. अश्या सातत्याच्या वक्तव्यामुळे तरुणाची माथी भडकून महाराष्ट्र अशांत ठेवण्याचे काम भिडे करत आहेत. यामुळे समस्त महात्मा फुले प्रेमी आणि इतर समाज सुधारकांच्या विचारांवर चालणाऱ्या समस्त नागरीकांच्या, आतोनात भावना दुखावल्या आहेत.

तरी करिता देशद्रोहाचा गुन्हा तात्काळ दाखल करण्यात यावा अन्यथा समस्त शिव, शाहू, फुले, आंबेडकर विचार प्रेमींच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. निवेदनावर समता परिषदेचे परभणी कार्याध्यक्ष नानासाहेब राऊत समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ काळे, संभाजी ब्रिगेडचे बाळासाहेब काजळे, इर्शाद पाशा, माजी नगरसेवक गंगाधर गोरे, शिवसेना शहरप्रमुख अरविंद कटारे, गुलाब नाहतकर, काशिनाथ हरकळ ,समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष श्याम सारंग, बालासाहेब मुधवर, शरद चव्हाण, रामप्रसाद माघाडे, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष एडव्होकेट माधव दाभाडे, ज्ञानदेव काळे, नाभिक सेवा संघाचे संदीप काळे, गणेश काळे, तहसीन देशमुख दत्ता कटारे करंजीचे सरपंच बंडू लांडगे आदी मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# महामहीम राष्ट्रपतींना एस.डी.ओ. मार्फत बसपाचे निवेदन.!

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** बहुजन समाज पार्टी खामगांव विधानसभा क्षेत्राचे वतीने महामहीम राष्ट्रपती यांना एस,डी.ओ. खामगांव मार्फत लेखी निवेदन देवुन कळविले की दिनांक 30/07/2023 रोजी अमरावती ( महाराष्ट्र ) येथे शिवप्रतिष्ठा हिन्दुस्थानचे संभाजी भिडे गुरुजी यांनी क्रांतिबा ज्योतीबा फुले यांच्या विषयी अभद्र टीकाटीपणी करुन मनूवादाने ग्रस्त असलेल्या मानसिकतेचे दर्शन करुन दिले व समाजमन दुषित करुन तेढ निर्माण केली त्या भाषणाची चौकशी होवुन संभाजी भिडे वर कायदेशिर कार्यवाही करुन शांतता अबाधित राहण्यासाठी त्यांना भाषण बंदी करावी. तसेच मणिपुर येथे कुकी अनुसुचित जमातीच्या अनेक पुरुषांचा खुन करुन व महीलांची द्वेषभावनेतून नग्न धिंड काढून त्यांचेवर सामूहीक बलत्कार करुन त्यांचे खुन केले व संवैधानिक मुल्य पायदळी तुडविले अशा क्रुरकर्मा नराधमांच्या विरोधात कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी आणि पिडीतांच्या वारसांना पन्नास लाख व जखमींना दहा लाख रुपयाची शासनाकडुन मदत मिळावी व मानवी मुल्य जोपासण्यासाठी देशात शांतता प्रस्थापित करावी असे बसपाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सह्यांचे लेखी निवेदन एस.डी.ओ खामगांव यांचे मार्फत दिले व त्याच्या प्रती अध्यक्ष केंद्रिय अनु.जाती. जमाती आयोग व ईत्यादीना पाठविल्या.



# शासकीय डिजिटल ग्रंथालयात येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी:** शासकीय डिजिटल ग्रंथालय घनसावंगी येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळेस वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लखन पवार जयेश होसुरकर रामेश्वर बोरकर शुभम डांगे कादंबरी खोजे नेहा भालेकर रोहिणी हिवाळे पवन वाघमारे अनिल सांगळे आकाश गायकवाड ईश्वर ऋषिकेश खैरे प्रसाद साळवे विशाल गायकवाड रहमान पठाण मोसिन विशाल सोमेश्वर राऊत ऋषिकेश सचिन मंगेश सिद्धेश आणि ग्रंथालयीन कर्मचारी तांत्रिक सहाय्यक शिवशंकर कटाळे आणि राजेंद्र पगारे हजर होते.








# गुरुद्वारावरील ब्रिजवर डिझेल टँकर पलटी

## टाकी फुटून हजार लिटर डिझेल पुलावरून वाहिले

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील गुरुद्वारा ब्रिज वरील बाजूस एका डिझेल टँकरचा अपघात तात्काळ वाहतूक नियंत्रण शाखेने धाव घेतली असता कुठलीही जीवित हानी झाली नाही.
धुळे शहरातील गुरुद्वारा वरील मोठ्या फुलावर डिझेल घेऊन जाणाऱ्या गाडीचा मोठा अपघात झाला त्या अपघातात चालक जखमी झाला असून त्याला तात्काळ हॉस्पिटल मध्ये भरती केले आहे हा अपघात एका दुचाकी चालकामुळे झाला असून दुचाकी स्वार गाडीच्या समोर आल्याने डिझेल टेम्पोचे नियंत्रण सुटले व टेम्पोची टाकी फुटून हजार लिटर डिझेल पुलावरून वाहत होते. त्या ठिकाणी पुलाच्या एका डिव्हायडरला ठोकून इलेक्ट्रिक बोलला ठोकला गेला व पोल इतर मोठ्या विद्युत वाहिनी तारांवर पडला व वाहतूक नियंत्रण शाखेचे कोते साहेब व वाहतूक नियंत्रण जिल्हाचे दत्तात्रय शिंदे यांनी महावितरण यांना फोन करून तात्काळ वीज वाहिनी बंद केली व सर्व वाहतूक नियंत्रण ठेवून मोठा धोका टाळता आला या घटनेत इतर कुठलीही जीवित आणि झाली नसून सर्व वाहतूक सुरळीत करण्यात आली या ठिकाणी अनेक अग्निशमन च्या गाड्या तात्काळ आल्या व पुलाच्या खालून वाहत असलेले डिझेल धुण्यात आले.

# पीक विमा योजनेस मुदतवाढ, उर्वरित शेतकऱ्यांनी त्वरित विमा भरावा

## तालुका कृषी अधिकारी यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुका कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यातील एकूण ४२ हजार हेक्टर लागवडलायक क्षेत्र असून त्यापैकी 31 जुलै अखेर 23301 शेतकऱ्यांनी 34213 हेक्टर म्हणजे 81 % क्षेत्रावर आपल्या पिकांचा विमा काढला आहे. तर मुदत वाढ मिळाल्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी शेवटचे तीन दिवस पिक विमा काढण्यासाठी राहिले असून शेतकऱ्यांनी वेळेत पिक विमा काढण्याचे आवाहन तालुका कृषि विभागाकडून करण्यात येत आहे.यावर्षी पिक विमा योजनेस 3 ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ मिळाली असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पिक विमा योजनेत भाग घ्यावा असे कृषि सहाय्यका मार्फत गावागावात प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे. या वर्षी केवळ एक रुपयामध्ये शासनाकडून पीक विमा काढून मिळत असल्याने शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात पिक विमा काढावा, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांच्या कडून वारंवार करण्यात येत आहे.




# अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळकांना सायकलिस्ट व जलतरण ग्रुपचे अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०३व्या जयंती निमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त येथील सायकलिस्ट व जलतरण ग्रुपच्या वतीने सकाळी सहा वाजता लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नियोजित असलेल्या पुतळ्याच्या जागी मंगळवार ( ता. ०१ ) रोजी एकत्र जमून त्यांच्या प्रतिमाना पुष्प अर्पण करून अभिवादन केले. सर्व सायकलिस्ट यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व टिळकांचा जय जय कार करीत शहरातील नागरिकांना"सायकल चालवा -आयुष्य वाढवा, सायकल चालऊ-निरोगी राहू तलावात पोहू या- आरोग्यदायी जीवन जगू या,पोहू या-पोहुं या-आरोग्याचा पाठ सर्वां शिकवू याअशा घोषणा देत सायकल फेरी ही काढून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व टिळकांना अभिवादन केले.



# जिल्हा जात पडताळणी कार्यालयात अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** शेतकरी, शेतमजूर, श्रमिक यांच्या वेदना आपल्या साहित्यातून मांडणारे, बहुजनांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा देणारे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती दिनानिमित्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नांदेड येथे, दिनांक 01 ऑगस्ट 2023 रोजी समितीचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव बापू दासरी यांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यालयात जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी मुकुंद मुळे, सिद्राम रणभिरकर, विठ्ठल आडे, संजय पाटील, सोनू दरेगावकर, मनोज वाघमारे, ओमशिवा चिंचोलकर, अनिकेत वाघमारे यांच्यासह सर्व कर्मचारी यांची उपस्थिती होती..!

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाउ साठे यांच्या जयंतीनिमित्त सोयगाव एस टी बस्थानक परिसरात त्यांच्या प्रतिमेस तहसीलदार मोहनलाल हरणे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सोयगाव एस टी आगार प्रमुख विजय काळवने, शिवसेना तालुका प्रमुख दिलीप मचे,शहर प्रमुख तथा अण्णाभाऊ साठे फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक बागुल,महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष रामा एलिस, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष भरत पगारे, कार्याध्यक्ष राजू दुतोंडे,लोहारा येथील व्याख्याते गुणवंत क्षीरसागर, व सुदानवा केनेकर महाराज, यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. तसेच अण्णाभाऊ यांच्या जीवन कार्यावर विचार मांडले. यावेळी नाभिक संघटनेचे अध्यक्ष नितीन सोनवणे, जिवा सेनेचे अध्यक्ष भगवान पंडित, पत्रकार संघाचे विजय काळे, ईश्वर इंगळे,रवींद्र काटोले,दत्तू काटोले, यासिन बेग,यांच्यासह संदीप चौधरी, पंकज परदेशी, ज्ञानेश्वर ईवरे, रंगनाथ वाणी, गोकुळ परदेशी, बाबा बंशी, संतोष पाखरे,मानकर,अनिल एलिस, सतीश नेरपगार, व माणिक सोनवणे यांनी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू दुतोंडे यांनी तर आभार दीपक बागुल यांनी मानले.



# खुलताबाद महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने बंडू आव्हाड यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुका तलाठी संघाच्या अध्यक्षपदी बंडू आव्हाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल खुलताबाद महसूल कर्मचाऱ्यांच्या वतीने बंडू आव्हाड यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष पी एब राजपूत तर टी वाय रोकडे अनिल भगत राजू देवळे हरिदास पांढरे विनेश महेर अथर्व चौधरी राजीव गुंजाळ अनिल घोरपडे भिकन मोरे विजय पवार हे उपस्थित होते.





# अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास

## कर्मचारी वाढवण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा.:** भारतीय स्टेट ऑफ इंडिया ( कृषी ) शाखेमध्ये जळगाव जामोद तालुक्यातील अंदाजे ३० गावाचा समावेश असुन या शाखेमध्ये शेतकरी खातेदार मोठ्या प्रमाणावर आहे.

गेली काही दिवसांपासून या शाखेमध्ये सहाय्यक शाखा व्यवस्थापक व लिपिक पदाच्या जागा रिक्त आहेत. हे रिक्त असलेले पदे भरावी त्यामुळे बाकी इतर कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण पोहोचत आहे. अशी मागणी बँक मॅनेजर यांनी सुद्धा त्यांच्या वरिष्ठाकडे पत्रव्यवहार केला तरीही कर्मचारी मिळाले नाही असे बँक मॅनेजर यांनी सांगितले. यामुळे खातेधारक शेतकऱ्यांना कमी कर्मचारी असल्यामुळे खूप मोठा नाहकत्रास सहन करावा लागत आहे. सध्या परिस्थितीला जळगाव जामोद तालुक्यात ढगफुटी मुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले. त्या नुकसानीचा मोबदला पी एम किसान चे पैसे चेक करण्याकरता तालुक्यातील शेतकरी बँकांचामध्ये चकरा मारत आहे. काही कर्मचारी लोकांची गर्दी पाहता उडवाउडवीची उत्तरे देतात थोड्या लहान मोठ्या कामांसाठी दोन-दोन वेळा बोलावतात याचा शेतकऱ्यांना हा त्रास होतो.

अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे आमच्या शेतकऱ्यांना त्रास होत असेल तर हे आम्ही खपवुन घेणार नाही. भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया कृषी शाखेमध्ये रिक्त असलेली कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात यावी. अशी मागणी युवा आंदोलक अक्षय पाटील यांनी बँक मॅनेजर यांच्याकडे लावून धरली यावेळी वैभव जाणे, विठ्ठल पाटील तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.





# चांदई एक्को येथील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश ; गौरी ढाकणे जिल्ह्यात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज


**श्रीक्षेत्र राजूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता आठवी स्कॉलरशिप( उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा )परीक्षेची सन २०२३ ची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर करण्यात आली असून यामध्ये भोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चांदई एक्को येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी गौरी समाधान ढाकणे या विद्यार्थिनी ७४% टक्के गुण घेऊन जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच शाळेतील इतर नऊ विद्यार्थीही गुणवत्ता यादीत झळकले आहेत. यामध्ये मयुरी गिरी, कल्याणी मुळे, कीर्ती पवार, कोमल वाघमारे, आयशा मदार, निखिल गंगावणे, अंकुश ढाकणे ,सौरभ ढाकणे या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल भोकरदन पं.स.चे गटशिक्षणाधिकारी दिलीप शहागडकर,सरपंच रामदास तळेकर,उपसरपंच विष्णू मोरे, केंद्रप्रमुख अण्णा इंगळे, केंद्रीय मुख्याध्यापक पी.पी. पालोदे, पोलिस पाटील दादाराव पवार,जगनराव पवार, रामदास तळेकर, बाबासाहेब ढाकणे,रघुनाथ ढाकणे,भगवान ढाकणे, अनिल वरकड, भरत थोरात,जगदेव घुगे, विजय साळवे, भगवान लहाने, महानंदा डोके, कल्पना जगताप आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आचार्य बाळकृष्णजी महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त जडीबुटी दिवस व प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** श्रद्धेय आचार्य बाळकृष्ण जी महाराज यांच्या



जन्मदिनानिमित्त नांदेड जिल्हा पतंजली योगपीठ परिवारातर्फे भाग्यनगर जवळ चितळे एक्सप्रेस, महालक्ष्मी फूड्स अँड स्नॅक्स ठिकाणी शुक्रवारी दिनांक ४ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजता संकल्पयज्ञ नारायणराव कुलकर्णी व यादवजी भांगे यांच्या मार्गदर्शनाद्वारे संपन्न होणार आहे.

सकाळी ९.०० वा सरदार हरजीतसिंग कडेवाले असिस्टंट सुपरिंटेंडेंट गुरुद्वारा सचखंड बोर्ड नांदेड, प्राचार्या डॉ. मेजर निर्मला कोरे अध्यक्षा महिला आघाडी फेस्कॅाम उत्तर मराठवाडा जेष्ठ नागरिक संघ, अनिल शेटकार उद्योजक व चेअरमन बसवेश्वर लँड डेव्हलपर्स नांदेड, संतोष मुगटकर संचालक वृक्षमित्र फाउंडेशन नांदेड, एडवोकेट उदय संगारेड्डीकर नैसर्गिक शेती मार्गदर्शक व सिनेट मेंबर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, राजेश सतोनकर प्रोप्रायटर महालक्ष्मी फुड्स अँड स्नॅक्स भाग्यनगर नांदेड या मान्यवरांच्या उपस्थितीत जडीबुटी गुणधर्म असलेले देशी झाडे व रोपांचे तसेच आहार दिनचर्या ची माहिती असलेल्या भिंती पत्रकांचे भव्य प्रदर्शनाची दीप प्रजलवनाने सुरुवात होणार. सकाळ ९.०० ते रात्री ८.०० पर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे.

नांदेड नगरीतील निसर्गप्रेमी व योगप्रेमी यांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा असे पतंजली योगपीठ परिवाराचे सहराज्य प्रभारी अनिल अमृतवार यांनी सांगितले.



# लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने साहित्यरत्न कॉ. अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोकस्वराज्य आंदोलनच्या वतीने साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. मंगळवारी सकाळी दहा वाजता एन-2 जे सेक्टर येथील पुतळ्यास प्रदेशाध्यक्ष नामदेव गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी लोकस्वराज्य आंदोलन जिल्हाध्यक्ष अतुल खंडगावकर, ज्येष्ठ नेते दशरथ मानवतकर, सुभाष पाटील पांडभरे, कॉ. भास्कर लहाने, दीपक म्हस्के, संदीपान काळे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर